पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

• वर्ष १६ • अंक ७१ • बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

## »थोडक्यात

### तुकाराम मुंढे यांच्या पोस्टने खळबळ

मुंबई : महाराष्ट्र अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी रुग्णालयांमध्ये सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या वस्तूंच्या किमतींचा आढावा घेण्यास केंद्रीय अधिकाऱ्यांना सांगितले आहे. 'मिंट'च्या वृत्तानुसार, एका राज्यस्तरीय सर्वेक्षणात काही प्रकरणांमध्ये खरेदी किमतीवर २,८४१ टक्क्यांपर्यंत वाढीव दर आकारल्याचे उघड झाले आहे. १० ऑगस्ट रोजी, मुंडे यांनी औषधनिर्माण विभाग आणि राष्ट्रीय औषध किंमत प्राधिकरण यांना एक पत्र पाठवले. या पत्रात, मुंडे यांनी या निष्कर्षांचा आढावा घेण्याची आणि योग्य नियामक कारवाई करण्याची विनंती केली आहे. अहवालानुसार, व्यापारातील नफ्यावर मर्यादा घालणे किंवा अत्यावश्यक उपकरणांच्या श्रेणींना निश्चित किंमत देखरेख प्रणालीखाली आणणे, यांसारख्या प्रस्तावांचा यात समावेश आहे.

---

### बिहार पुराच्या विळख्यात

**पाटणा :** बिहारमधील १५ जिल्ह्यांतील ५७५ पंचायतींमधील सुमारे ५० लाख लोकसंख्या पूरपरिस्थितीमुळे अडकून पडली आहे. कटिहारमध्ये सरकारी शाळा आणि कोचिंग सेंटर्स पाण्याखाली गेली असून, मुलांना बोटीत बसूनच वर्ग अटेंड करावे लागत आहेत. राज्यातील २६ जिल्ह्यांना पावसाचा 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून, वीज पडण्याबाबतही इशारा देण्यात आला आहे. उत्तर प्रदेशात पावसामुळे नद्या दुथडी भरून वाहत आहेत. यामुळे २६ जिल्ह्यांत पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. या पुराचा ४ लाख लोकांना फटका बसला आहे. लखीमपूरमध्ये शारदा नदीच्या तीव्र प्रवाहामुळे होणाऱ्या जमिनीच्या धूपेमुळे २४ तासांच्या कालावधीत सात घरे वाहून गेली आहेत.

# अमेरिकेत परदेशी विद्यार्थ्यांना नोकरी करणे महागणार!

## 1 कोटी रुपयांचे शुल्क वसूल करण्याची ट्रम्प सरकारची तयारी

वृत्तसंस्था १६ सप्टेंबर



**नवी दिल्ली:** अमेरिकेत उच्च शिक्षण घेतल्यानंतर तिथेच नोकरी करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या परदेशी विद्यार्थ्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अमेरिकेतील ट्रम्प प्रशासन परदेशी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरीचा मार्ग अधिक महागडा आणि कठीण करण्याची तयारी करत आहे. नवीन प्रस्तावानुसार, शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नोकरी करण्यासाठी विद्यार्थ्यांना तब्बल १ लाख डॉलर म्हणजेच सुमारे ९६ लाख ते १ कोटी रुपये शुल्क भरावे लागू शकते.हे नवीन शुल्क ऑप्शनल प्रॅक्टिकल ट्रेनिंग नियमांतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे. ओपीटी ही अशी प्रणाली आहे, ज्याद्वारे परदेशी विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण झाल्यावर अमेरिकेत काम करण्याची अधिकृत परवानगी मिळते. या प्रस्तावाला व्हाईट हाऊसची मंजुरी मिळाली असून, लवकरच यावर जनता आणि विविध संस्थांकडून आक्षेप व सूचना मागवल्या जाणार आहेत.अमेरिकेत एवढा मोठा खर्च वाढल्यास विद्यार्थी आता जर्मनी, फ्रान्स यांसारख्या युरोपीय देशांकडे वळण्याची शक्यता आहे. दरम्यान, या अनिश्चिततेच्या वातावरणात कोलंबिया विद्यापीठाने आपल्या परदेशी विद्यार्थ्यांना ईमेल पाठवून परिस्थितीवर बारीक लक्ष असल्याचे सांगत दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

### सध्याचे शुल्क आणि प्रस्तावित वाढ

सध्या अमेरिकेत ओपीटी अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांना केवळ ४० हजार रुपये शुल्क द्यावे लागते. परंतु, नवीन नियम लागू झाल्यास विद्यार्थ्यांना सध्याच्या शुल्कापेक्षा कित्येक पटींनी जास्त रक्कम मोजावी लागेल. अमेरिकेत पदवी शिक्षणाचा खर्च आधीच ५० लाख रुपयांपर्यंत असतो. त्यात राहण्याचा आणि खाण्याचा खर्च वेगळा असतो. अशा परिस्थितीत १ कोटी रुपयांचे अतिरिक्त शुल्क आकारल्यास विद्यार्थ्यांवर प्रचंड आर्थिक ताण येईल.

### भारतीय विद्यार्थ्यांवर सर्वाधिक परिणाम

अमेरिकेत सध्या ११ लाखांहून अधिक परदेशी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, ज्यामध्ये तब्बल ३.६३ लाख भारतीय विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सध्या २ लाखांपेक्षा जास्त भारतीय विद्यार्थी ओपीटी अंतर्गत अमेरिकेत नोकरी करत आहेत. त्यामुळे हा नियम लागू झाल्यास याचा सर्वाधिक फटका भारतीय विद्यार्थ्यांना बसणार आहे. सामान्य पदवीधर विद्यार्थ्यांना शिक्षणानंतर १२ महिने नोकरी करण्याची मुभा मिळते. तर स्टेम ( विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित) विषयातील विद्यार्थ्यांना अतिरिक्त २४ महिने, म्हणजेच एकूण ३६ महिने (३ वर्षे) काम करण्याची संधी मिळते.

# अकोला क्रिकेट क्लबच्या ग्राऊंडवर कचराच कचरा

## महापालिकेने शुल्क घेतले, साफसफाई कोण करणार?

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**अकोला :** अकोला शहरात गणेशोत्सवानंतर क्रिकेट क्लबच्या मैदानावर कचऱ्याचे मोठे ढिग साचल्याचे चित्र समोर आले आहे. श्री गणेशमूर्ती विक्रीसाठी महापालिकेच्या वतीने व्यावसायिकांना या जागेवर स्टॉल उभारण्याची परवानगी देण्यात आली होती. यासाठी महापालिकेने व्यावसायिकांकडून नियमानुसार रीतसर शुल्कही वसूल केले. परंतु, उत्सव संपल्यानंतर मैदानाची दुरवस्था झाली असून सर्वत्र कचरा पसरला आहे. गणपती बाप्पाच्या मूर्ती विक्रीच्या ठिकाणी कागद, थर्मोकोल, प्लास्टिक, पेंढा, सुतळी आणि लाकडी पट्ट्यांचा मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. मैदान मोकळे करून व्यापारी निघून गेले, मात्र कचऱ्याचे ढीग तसेच सोडून देण्यात आले आहेत. यामुळे परिसरातील नागरिकांना तसेच मैदानावर सरावासाठी येणाऱ्या खेळाडूंना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाऱ्यामुळे हा कचरा आसपासच्या निवासी भागातही पसरत असून दुर्गंधी निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. महापालिकेने स्टॉलधारक व्यावसायिकांकडून सफाई आणि जागेचे शुल्क वसूल केले असतानाही प्रशासनाकडून मैदानाची सफाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे 'शुल्क वसुलीत तत्पर असणारे महापालिका प्रशासन सफाईच्या वेळी सुस्तावले का?' असा संतप्त सवाल नागरिक आणि क्रीडाप्रेमी विचारत आहेत. या पार्श्वभूमीवर, या ऐतिहासिक मैदानाची स्वच्छता करण्यासाठी नेमका कोण पुढाकार घेणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. महापालिका प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन मैदान पूर्ववत स्वच्छ करावे, अशी जोरदार मागणी खेळाडू व अकोलेकरांमधून केली जात आहे.

# यूपीआयवरील शुल्क म्हणजे जनतेची उघड लूट

## विजय वडेट्टीवारांची केंद्र सरकारवर सडकून टीका

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**नागपूर :** केंद्रातील मोदी सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे देशाची अर्थव्यवस्था पूर्णपणे दोलायमान झाली असून देश कर्जाच्या खाईत लोटला गेला आहे, असा घणाघाती आरोप विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी बँकिंग व्यवस्था, उद्योगपतींची कर्जमाफी आणि यूपीआय व्यवहारांवर लादल्या जाणाऱ्या शुल्कावरून सरकारवर जोरदार तोफ डागली. 'मोठ्या उद्योगपतींचे १६ लाख कोटींचे कर्ज माफ करणारे सरकार आता डिजिटल व्यवहारांच्या नावाखाली सामान्य जनता आणि छोट्या व्यापाऱ्यांच्या खिशात हात घालत आहे,' असा थेट आरोप त्यांनी केला.

कॅशलेस व्यवहारांवर आकारल्या जाणाऱ्या शुल्काचे गणित मांडताना वडेट्टीवार म्हणाले, यूपीआयच्या माध्यमातून २,००० रुपयांच्या व्यवहारावर १२ रुपये आकारले जात आहेत, म्हणजेच सुमारे ०.४ टक्के शुल्क बँकांच्या खात्यात जमा होत आहे. जर एखाद्या व्यापाऱ्याचे १ लाख रुपयांचे व्यवहार झाले, तर त्यावर ६०० रुपये सरकार वसूल करेल. व्यापारी हा भुर्दंड स्वतः सोसणार नसून शेवटी तो ग्राहकांकडूनच वसूल केला जाईल. ग्राहक आणि व्यापारी यांच्यातील दैनंदिन खरेदी-विक्रीच्या व्यवहारातून अशा प्रकारे वसुली करण्याचा अधिकार सरकारला कोणी दिला? सरकार केवळ गरिबांना लुटून उद्योगपतींचे खिसे भरण्याचे काम करत असल्याचा आरोप त्यांनी केला. देशातील बँकिंग क्षेत्राच्या स्थितीवर चिंता व्यक्त करताना त्यांनी केंद्रावर ताशेरे ओढले. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या मोजक्या उद्योगपती मित्रांना पोसण्याचे काम करत आहेत. १६ लाख कोटी रुपयांची महाकाय कर्जमाफी देताना सरकारने सामान्य करदात्याचा कोणताही विचार केला नाही. बँकांचे प्रचंड भांडवल एकाच उद्योग समूहाकडे वळवले जात असून, जर अदानींचा डोलारा खचला तर संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होईल आणि बँका बुडीत निघतील, अशी भीती त्यांनी व्यक्त केली. आज बँकांची आर्थिक स्थिती इतकी कमकुवत झाली आहे की, भविष्यात सामान्य माणसाला स्वतःचे पैसे काढणेही अवघड होईल.

# विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी एसटी बस उलटली!

**पुणे :** बारामती तालुक्यातील सुपे घाटात आज सकाळी विद्यार्थ्यांना घेऊन जाणारी एसटी बस चालकाचा ताबा सुटल्याने उलटली. बसमध्ये सुमारे ६० ते ७० विद्यार्थी-विद्यार्थिनी प्रवास करत होते. या अपघातात चार विद्यार्थी जखमी झाले असून, त्यापैकी दोघांना पुढील उपचारासाठी लोणी काळभोर येथील विश्वराज हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही एसटी बस चौफुल्याकडून सुप्याच्या दिशेने विद्या प्रतिष्ठानच्या विद्यार्थ्यांना घेऊन जात होती. सुपे घाटातील पहिल्या वळणावर बस चढत असताना चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने बस मागे सरकली आणि रस्त्याच्या कडेला उलटली झाली. बसने एक पलटी घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी तातडीने बसमधून बाहेर पडत सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला. या घटनेत चार विद्यार्थी जखमी झाल्याची माहिती विद्या प्रतिष्ठान इंग्लिश मीडियम स्कूलचे प्राचार्य योगेश पाटील यांनी दिली. घाटातील अपघाताचा आवाज ऐकून स्थानिक ग्रामस्थ व परिसरातील प्रवाशांनी तातडीने मदतीसाठी घटनास्थळी धाव घेतली. बसमधील जखमी विद्यार्थ्यांना तातडीने बाहेर काढून उपचारासाठी नजीकच्या खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# मनोज जरांगे पाटलांची प्रकृती खालावली; डॉक्टरांचा गंभीर इशारा!

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



बीड : मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गात मोठा अडथळा आला आहे. उपोषणामुळे मनोज जरांगेंची प्रकृती प्रचंड खालावली आहे. मनोज जरांगे पाटील बुधवारी सकाळी ११ वाजता पाटोद्याहून पुढच्या मुक्कामाला म्हणजे श्रीगोंद्याला रवाना होणार होते. मात्र, आज सकाळपासून मनोज जरांगे यांची प्रकृती प्रचंड खालावली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील अजूनही झोपून आहेत. त्यांना जागेवरुन हलणेही अशक्य झाले आहे. त्यामुळे आज मनोज जरांगे पाटील पुढच्या मुक्कामला निघणार की बीडच्या पाटोद्यातच आराम करणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पाटोद्यात डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांची तपासणी केली. जरांगे यांनी उपचार न घेतल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते, असे डॉक्टरांनी म्हटले. आम्ही उपचार घेण्याची विनंती केली. पण मनोज जरांगे ऐकायला तयार नाहीत. मनोज जरांगे यांनी उपचार घ्यायला हवेत, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके यांनी म्हटले. मनोज जरांगे यांची प्रकृती आम्ही तपासली. त्यांचा रक्तदाब आणि शुगरची पातळी खालवाली आहे. आम्ही आता जरांगेंना सलाईन लावली आहे. मनोज जरांगे यांच्या शरीरात आणखी डिडायड्रेशन झाले तर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यांचा युरिन रिपोर्ट पाहून पुढचा निर्णय घेतला जाईल. त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज आहे. आम्ही त्यांना विनंती करुन बघू. त्यांना फक्त सलाईन लावून मुंबईपर्यंत जाता येणार नाही. ते गंभीर डिहायड्रेशनच्या लेव्हलच्या जवळ पोहोचले होते, असेही डॉक्टरांनी सांगितले. मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानातील उपोषणाला परवानगी नाकारली आहे. आतापर्यंत मुंबई पोलिसांनी जरांगे यांचे दोन अर्ज फेटाळले आहे. मनोज जरांगे यांनी तिसऱ्यांदा अर्ज केला असून ते उच्च न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान, आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांची माहिती पोलिसांनी मागितल्याचे समजते. जे ५० आंदोलक आंदोलन करणार आहे त्यांचे मोबाईल नंबर आणि डिटेल्स पोलिसांनी मागवले आहेत. सोबतच कोणत्या वाहनातून येणार आहे त्या वाहनांचा तपशीलही पोलिसांनी मागितला आहे. आंदोलनाला कोण पन्नास लोक असणार हे मनोज जरांगे पाटील ठरवणार. त्यानंतर आझाद मैदान पोलीस स्टेशनला ही सर्व माहिती दिली जाणार. ही माहिती दिल्यानंतर पोलीस आंदोलनाला परवानगी देणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदानात उपोषण करण्याची परवानगीच्या संदर्भातील कोणतीही याचिका अद्याप मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली नाही. मात्र, त्यांच्याकडून तातडीच्या सुनावणी अंतर्गत परवानगीबाबत याचिका दाखल करण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी प्रमुख सरकारी वकील शिशिर हिरे यांच्या भेटीसाठी हायकोर्टात दाखल झाले आहेत.

# कृषी विद्यापीठात बदल्यांचे नियम गुंडाळले!

## कृषी परिषद, राज्य शासन व लोकायुक्तांकडे तक्रार; उच्चस्तरीय चौकशीचे आदेश !

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अकोला :** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील आस्थापना विभागात कायदा, नियम आणि प्रशासकीय नैतिकतेचा पार बोजवारा उडाला आहे. गेल्या १० ते तब्बल २५ वर्षांपासून एकाच पदावर आणि एकाच टेबलवर ठाण मांडून बसलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचा मुद्दा आता पेटला असून विद्यापीठातील या मनमानी कारभाराविरोधात तीव्र उद्रेक निर्माण झाला आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा अधिनियम २००५ आणि विद्यापीठाच्या स्वतःच्या कार्यकारी परिषदेच्या विशेष सभेतील मंजूर ठरावांना पायदळी तुडवून धडधडीत नियमबाह्य कामे सुरू असल्याचा घणाघाती आरोप एका कर्मचाऱ्याने केला आहे. या बदली टाळण्याच्या महाघोटाळ्या प्रकरणी थेट लोकायुक्त आणि राज्य शासनाच्या कृषी विभागाकडे तक्रार धडकली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, कृषी परिषद, राज्य शासन व लोकायुक्त यांच्याकडून सातत्याने चौकशी आदेश असताना विद्यापीठ प्रशासनाने चुप्पी साधली आहे.

काही 'भ्रष्ट कर्मचाऱ्यांच्या दबावापुढे विद्यापीठ प्रशासन पूर्णपणे शरण आले आहे की, या दीर्घकालीन ठाण मांडलेल्या कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने एखादा मोठा आर्थिक व प्रशासकीय घोटाळा दडपण्याचा प्रयत्न सुरू आहे ?' असा जळजळीत सवाल आता उपस्थित केला जात आहे. या संपूर्ण मनमानीवर विद्यापीठाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, नेहमीप्रमाणे तो होऊ शकला नाही.




### कृषी परिषदेचा अंतिम 'अल्टिमेटम'

या गंभीर नियमभंगाची तातडीने दखल घेत महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेच्या सहसंचालक (प्रशासन) आरती भोसले यांनी पंदेकृवि अकोलाच्या कुलसचिवांना खरमरीत स्मरणपत्रे पाठवून वस्तूनिष्ठ अहवाल आणि कार्यकारी परिषदेचा ठराव तात्काळ सादर करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. २२ जुलै २०२६ आणि १३ ऑगस्ट २०२६ रोजी पाठवलेल्या शासकीय पत्रांनाही विद्यापीठाने वाटाण्याच्या अक्षता लावल्यामुळे, कृषी परिषदेने ०९ सप्टेंबर २०२६ रोजी अत्यंत कडक शब्दांत 'स्मरणपत्र-२' जारी करत १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचा अंतिम इशारा (अल्टिमेटम) दिला होता. शासकीय आदेश आणि कायद्याला धाब्यावर बसवणाऱ्या आस्थापना विभागातील या कर्मचाऱ्यांना तात्काळ हटवून, त्यांच्यावर उच्चस्तरीय चौकशीचा बडगा उगारण्याची आणि तातडीने 'टेबल फेरबदल' व प्रशासकीय बदल्या लागू करण्याची मागणी आता अत्यंत आक्रमकपणे लावून धरली जात आहे.

### कायद्याचे धिंडवडे आणि कार्यकारी परिषदेच्या ठरावाला पायदळी तुडवले !

विद्यापीठ कर्मचाऱ्याने पुराव्यासह सादर केलेल्या तक्रार अर्जातील तांत्रिक मुद्द्यांनुसार, 'महाराष्ट्र नागरी सेवा (बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध) अधिनियम २००५' च्या कलम ३ व ४ मधील स्पष्ट वैधानिक तरतुदींनुसार तसेच १० मार्च २०१२ रोजी झालेल्या कार्यकारी परिषदेच्या ठराव क्र. काप/२९/२०१२ (परिशिष्ट-२७) च्या निकषानुसार कोणत्याही अधिकाऱ्याचा अथवा कर्मचाऱ्याचा एका पदावरील कार्यकाळ जास्तीत जास्त ३ वर्षांचा असणे कायदेशीरदृष्ट्या अनिवार्य आहे. परंतु, पंदेकृवि प्रशासनाने या सर्व कायद्यांना आणि स्वतःच्याच धोरणांना तिलांजली दिली आहे. आस्थापना विभागात काही कर्मचारी १० ते १५ वर्षांपासून, तर काही महाभाग तब्बल २२ ते २५ वर्षांपासून एकाच खुर्चीवर आणि एकाच टेबलवर जम बसवून आहेत. विशेष म्हणजे, या काळात २ ते ३ वेळा पदोन्नत्या मिळूनही त्यांच्या बदल्या न करता त्यांना प्रशासकीय छत्रछायेखाली जाणीवपूर्वक पाठीशी घातले जात आहे. या नियमबाह्य संरक्षणामुळे विद्यापीठात एकछत्री मक्तेदारी आणि दलालशाही निर्माण झाली असून संपूर्ण कामकाजाच्या निष्पक्षतेवर आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### मंत्रालय आणि लोकायुक्तांचा थेट हस्तक्षेप

विद्यापीठ स्तरावर कुलगुरू आणि कुलसचिवांकडे वारंवार लेखी निवेदने, सबळ पुरावे व कडक स्मरणपत्रे देऊनही प्रशासनाने याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. अखेर या प्रशासकीय निष्क्रियतेला कंटाळून तक्रारदाराने लोकायुक्त, मुंबई यांच्याकडे 'नमुना अ' मध्ये प्रतिज्ञापत्रासह अधिकृत तक्रार दाखल केली. त्याचबरोबर राज्य शासनाच्या 'आपले सरकार' / पी.जी. पोर्टलद्वारे थेट मंत्रालयाकडे दाद मागण्यात आली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत राज्य शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाने तसेच पुण्याच्या महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेने तातडीने कठोर चौकशीचे निर्देश दिले आहेत.



## अभियंत्यांचे आपल्या जीवनातील महत्त्व

अभियंता (Engineer) हा आधुनिक समाजाचा खरा शिल्पकार असतो. आपल्या दैनंदिन जीवनातील सोयी-सुविधांपासून ते देशाच्या विकासापर्यंत प्रत्येक क्षेत्रात अभियांत्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे.

**तंत्रज्ञान आणि नवसंशोधन:** मोबाईल, संगणक, इंटरनेट आणि एआय (AI) यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती करून अभियंत्यांनी जग जवळ आणले आहे.

**पायाभूत सुविधांचा विकास :** उंच इमारती, भक्कम पूल, रस्ते, धरणे आणि उड्डाणपूल बांधून मानवी जीवन सुरक्षित व सुकर करण्याचे काम सिव्हिल अभियंते करतात.

**उद्योग आणि उत्पादन:** कारखाने, गाड्या, विमाने आणि विविध यंत्रांचे डिझाइन व उत्पादन करून मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल अभियंते देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देतात.

**आरोग्य आणि पर्यावरण:** वैद्यकीय क्षेत्रातील अत्याधुनिक उपकरणे आणि अक्षय ऊर्जा निर्मितीत अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.

# ऐतिहासिक मानाचा बाराभाई गणपती...!



लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला, त्यावेळी जुने शहरातील असदगड किल्ल्याभोवतीच्या छोट्याशा अकोला शहरात पाच सात मंडळे स्थापन झाली. मोठ्या थाटात मिरवणूक काढली जायची. विसर्जन मिरवणुकीत सर्वात प्राचीन व जुना गणपती म्हणून प्रथमस्थान श्री बाराभाई गणपतीला मिळे. त्याला दुसरे एक कारण होते ते म्हणजे त्यावेळी मिरवणूक काढणे म्हणजे एक दिव्य होते. दीडशे वर्षांचा इतिहास असलेल्या पेशवे कालीन तथा प्राचिन अकोल्याचा मानाचा गणपती म्हणून अकोल्यातील जुनेशहरातील श्री बाराभाई गणपती संपूर्ण महाराष्ट्रात प्रख्यात आहे. आजही या गणपतीला भक्तगण मोठ्या भक्ती भावाने दर्शनाला येऊन मनोकामना पूर्ण करतात. विसर्जनाच्या वेळी सर्वात आधी मानाचा गणपती म्हणून प्रथम पूजल्या जातो. श्री बाराभाई गणपतीची प्रथम विधिवत पूजाअर्चा, आरती करुनच अकोल्यातील गणपती विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ होतो. ही परंपरा अजूनही कायम आहे. श्री बाराभाई गणपती अकोला शहरातील गणेश उत्सवाचे आगळे वेगळे आकर्षण आहे. विसर्जन मिरवणुकीत पहिल्या क्रमांकाच्या स्थानावर श्री बाराभाई गणपती व दुसऱ्या स्थानावर श्री राजराजेश्वरचा गणपती असतो.

१८९० पासून सुरू झालेली ही प्रथा आजही अखंडपणे उत्साहात सुरू आहे. मानाचा गणपती अकोल्यातच नव्हे तर पूर्ण महाराष्ट्रात बाराभाई गणपती प्रसिद्ध आहे. हा गणपती प्रथम मानाचा समजला जातो, शेकडो वर्षांपासून ही प्रथा अखंड सुरु आहे. पुढेही सुरुच राहणार आहे, आता बाराभाई गणपती म्हणजे काय ? तो कोठे व केव्हा स्थापन झाला ? याविषयी जनमानसात अनेक दंतकथा ऐकावयास मिळते. बाराभाई गणपतीची स्थापना नेमकी केव्हापासून सुरू झाली, याबाबत अजूनपर्यंत कोणतीही नोंद सापडलेली नाही.

बाराभाई गणपतीचे आजचे मुख्य प्रवर्तक व परंपरागत चालक धर्मनाथ एकनाथ इंगळे यांच्या मते हा गणपती पेशवेकालीन असावा. पेशवेकालीन बारभाईच्या कारस्थानाशी यांचा निकट संबंध असावा म्हणूनच याला बाराभाई हे नाव प्राप्त झाले आहे, अशी परंपरागत माहिती आहे. दरवषी बाराभाई गणपती स्थापना, पूजाअर्चना आणि विसर्जन इंगळे कुटुंबियांकडून होते.

विशेष म्हणजे बाराभाई गणपती उत्सवासाठी कुणाकडूनही वर्गणी गोळा केल्या जात नाही, असे विद्यमान अध्यक्ष धर्मनाथ इंगळे हे आवर्जून सांगतात. बाराभाई गणपतीचे सर्वेसर्वा इंगळे कुटुंब कसे झाले, या करिता भूतकाळात जावे लागेल, सार्वजनिक असणारा बाराभाई गणपती इंगळे कुटुंबाकडे कसा आला, याचा इतिहास मोठा मनोरंजक आहे. अध्यक्ष धर्मनाथ इंगळे यांची परंपरा व ऐकीव माहिती सांगते की, श्री बाराभाईचा गणपती रुढी परंपरेने स्थापन केला जात असे. मात्र कालांतराने त्यातला उत्साह कमी होत गेला. त्यातल्या त्यात सामाजिक व राजकीय निरुत्साहाचा तो काळ लोकांमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा न करण्याचे ठरले. मंडळी जवळपास संपुष्टात आली, पण परंपरागत बाराभाई गणपतीचे काय होणार, असा प्रश्न निर्माण झाला. त्यावेळेस संस्थापक अध्यक्ष कै. भगवाननाथजी इंगळे सार्वजनिक नाही तर नाही पण बाराभाईचा गणेश उत्सव आपल्या स्वतःच्या घरी साजरा करण्याचे ठरविले, त्या वर्षापासून बाराभाई गणपती उत्सव इंगळे यांच्या घरी साजरा केला जातो. मानाचा गणपती श्री बाराभाई गणपतीला आज सुमारे १५१ हून अधिक वर्षे झालीत. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरू केला, त्यावेळी जुने शहरातील असदगड किल्ल्या भोवतीच्या छोट्याशा अकोला शहरातही पाच-सात मंडळे स्थापन झाली.

मोठ्या थाटात मिरवणूक काढली जायची, विसर्जन मिरवणुकीत सर्वात प्राचीन व जुना गणपती म्हणून प्रथम स्थान श्री बाराभाई गणपतीला मिळे, त्याला दुसरे एक कारण होते, ते म्हणजे त्यावेळी मिरवणूक काढणे म्हणाजे एक दिव्य होते. ब्रिटिशांच्या अंमलात म्हणजे दुरापास्त कार्य होते. मात्र, यांनी या दिव्यातून जाण्याची तयारी केली. परधर्मीयांच्या सहकार्याने अतिशय शांत, संयमी व दूरगामी वृत्तीने त्यांनी ती विसर्जन मिरवणूक यशस्वी करून दाखविली होती. तेव्हापासून विसर्जन मिरवणुकीत पहिल्या क्रमांकाच्या स्थानावर श्री बाराभाई गणपती व दुसऱ्या स्थानावर श्री राजराजेश्वरचा गणपती अलिखित आहे. १८९० पासून सुरू झालेली ही प्रथा आजही अखंडपणे उत्साहात सुरू आहे. मूर्ती विसर्जित होत नाही. श्री बाराभाई गणपतीची मूर्ती गेल्या शंभराहून अधिक वर्षीपासून एकच आहे. त्या आधी कैक वर्षे पूर्ण आकार व पूर्ण संमिश्र स्वरूपाची नवी मूर्ती जुन्या पिढीतील मुर्तिकार ओंकारराव मोरे ठाकूर हे ती मूर्ती तयार करीत. त्यांच्या मृत्यूनंतर बाराभाईची मूर्ती तयार झालीच नाही. नवीन मूर्ती तयार करण्यासाठी परंपरागत चालक एकनाथ व रघुनाथ यांनी अनेकदा प्रयत्न केले. पण यश आले नाही, त्यामुळे ही मानाची मूती विसर्जित होत नाही, परंतु पूजेच्या मूर्तीचे विसर्जन केले जाते.

वैशिष्ट्य म्हणजे गणपतीचे पालखी वाहणारे भोईराज सुद्धा पिढ्यानपिढ्या आपली सेवा गणपती चरणी अर्पण करतात, कुठल्याही प्रकारचे मानधन घेत नाहीत. केवळ सेवाभाव, त्यांचे मानधन म्हणजे गणपतीच्या गळ्यातील हार, प्रसाद आणि एक नारळ, तसेच उमरी येथील मानाची दिंडीही पिढ्यांनपिढ्या ते सुद्धा कुठल्याच प्रकारचे मानधन घेत नाहीत. ते सुद्धा गणपतीच्या गळ्यातील हार आणि प्रसाद म्हणून नारळ मानधन म्हणून स्वीकारतात. श्री बाराभाई गणपतीविषयी अकोलेकरांना अतिशय श्रद्धा आहे. अनेक जण या गणपतीला साकडे घालतात, नवस करतात इच्छापूर्ती करतात. वद्धेने आणि विश्वासाने पूजला जाणारा श्री बाराभाई गणपतीच्या चरणी साष्टांग दंडवत..!

**विजय केंदरकर,**
ज्येष्ठ पत्रकार अकोला मो. ९३७१८५४७०६

## वाराणसी घाट संकल्पनेवर आधारित पर्यावरणपूरक गणेशोत्सव देखावा; कोंढाळीतील पियुष राऊत पाटील यांचा स्तुत्य उपक्रम



पर्यावरण संवर्धन आणि कलात्मकतेचा सुंदर संगम साधत कोंढाळी येथील रहिवासी पियुष राऊत पाटील यांनी या वर्षीच्या गणेशोत्सवात अत्यंत आकर्षक आणि वैविध्यपूर्ण देखावा साकारला आहे. वाराणसी येथील गंगा नदीच्या काठावर वसलेला ऐतिहासिक घाट आणि तेथील पुरातन मंदिराची सुंदर प्रतिकृती त्यांनी आपल्या बाप्पाच्या आराशीत लघुरूपात साकारली आहे.

### वेस्ट मटेरियलचा वापर करून साकारल्या कलाकृती

या देखाव्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे हा संपूर्ण परिसर टाकाऊतून टिकाऊ (वेस्ट मटेरियल) वस्तूंचा वापर करून अत्यंत कल्पकतेने तयार करण्यात आला आहे.

मंदिर आणि इमारती: कागदी पुठ्ठ्यांपासून हुबेहूब पुरातन मंदिर आणि घाट परिसरातील इमारतींची रचना करण्यात आली आहे. लाकडी खांब व होड्या: मंदिरातील लाकडी खांबांसाठी छोट्या बांबूंचा वापर केला आहे, तर गंगेतील जुन्या पारंपरिक नावा (होड्या) कागदापासून तयार करून त्यांना आकर्षक रंगसंगतीने सजवले आहे. पर्यावरणपूरक मूर्ती: बाप्पाची मूर्ती शेतातील लाल मातीपासून तयार करण्यात आलेली असून ती पूर्णपणे पर्यावरणपूरक आहे. डेकोरेशनसाठी लागणारे उर्वरित साहित्य घरातील न वापरल्या जाणाऱ्या वस्तू आणि शेतातील टाकाऊ घटकांपासून बनवले आहे.गणपती बाप्पाचे वाहन असलेल्या मुषकराजाला (उंदीर) या थीममध्ये अत्यंत रंजक आणि वेगळ्या स्वरूपात दाखवण्यात आले आहे. घाटावरील दैनंदिन जीवन आणि गडबड दाखवताना काही उंदीर दुकानातून हार-प्रसाद खरेदी करताना, तर काही इतर कामांत व्यस्त असल्याचे दाखवले आहे. मुषकराजांचे हे विविध रूप लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे. पियुष राऊत पाटील हे दरवर्षी वेगवेगळ्या सामाजिक आणि सांस्कृतिक थीमवर आधारित गणेशोत्सव डेकोरेशन करत असतात. त्यांच्या या कल्पक, आकर्षक आणि पर्यावरणपूरक देखाव्याचे परिसरातून कौतुक होत असून देखावा पाहण्यासाठी नागरिक गर्दी करत आहेत.

## सण, उत्सव साजरा करतांना जबाबदारीचे भान ठेवणं आवश्यक

पल्या देशात अनेक धर्माचे लोक राहतात. त्यामुळे वर्षभर कुठं न कुठं सण, उत्सव, जयंती वगैरे अत्यंत उत्साह आणि जल्लोषात साजरे केले जातात. या निमित्ताने मिरवणूकी, दिंडी, पालख्या, जुलूस काढण्यात येतात. किर्तन, कथा, प्रवचन आणि धार्मिक ग्रंथांच्या पठणाचे कार्यक्रम घेतले जातात. भोजन, महाप्रसाद, वगैरेचे आयोजन करण्यात येते. अश्या कार्यक्रमात पैशांची उधळण मोठ्या प्रमाणात केली जाते. आता कार्यक्रमांचे आयोजनच मुळात शक्ती प्रदर्शनासाठी केले जाते. याच स्पर्धेमुळे कार्यक्रमांचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व कमी झाले आहे. प्रदर्शन म्हंटले की, भपका आलाच. 'उसकी साडी, मेरी साडीसे सफेद कैसी', च्या युगात मोठाले मंडप, रोषणाई, भव्य मुर्ती, देखावे, कर्णकर्कश आणि हृदयाचे ठोके वाढवणारे तथाकथित संगीत, डोळ्यांसाठी हानीकारक असलेले लाईट लावण्यात येतात. तासंतास वाहतुकीची कोंडी करणाऱ्या मिरवणुकी काढल्या जातात. यात व्यक्तिगत सोहळे जसे लग्नाची वरात वगैरेची पण भर पडली आहे. मोठमोठाले पोस्टर्स, बॅनर, झेंडे आणि पताकांमळे परिसर बहूरंगी केला जातो.

परंतू पोस्टर्स फाडणे वगैरे अश्या समाज विघातक कृत्यांमुळे बरेच वेळा समारंभाला गालबोट लागते. सण, उत्सव साजरे करतांना जल, वायू आणि ध्वनी प्रदूषणाचे नियम धाब्यावर बसवले जातात. काही ठिकाणी अन्नाची प्रचंड नासाडी होते. पर्यावरणासाठी हानिकारक असलेले प्लास्टिक, थर्माकोल आदींचा सर्रास वापर करण्यात येतो. त्वचेसाठी धोकादायक असलेले रंग, गुलालाची उधळण केली जाते. फटाक्यांची आतषबाजी करतांना योग्य ती दक्षता घेतली जात नाही. त्यामुळे अनेकदा अपघात घडतात. काही कार्यक्रमात द्वयर्थी गाण्यांवर अंगप्रदर्शन करणारे वस्त्र परिधान करून नाच केल्या जातो. यात लहान मुले, मुली देखील सहभागी होतात. समारंभ पार पडल्यानंतर स्थळावर तसेच रस्त्यावर कचरा आणि घाण तशीच सोडली जाते. सण, उत्सव साजरे करणे हा, प्रत्येकाचा हक्क आहे. परंतू त्याच प्रमाणे काही सामाजिक कर्तव्य देखील आहेत हे विसरता कामा नये. राजकीय पक्ष तसेच संघटनांनी देखील आपले कार्यक्रम, उपक्रम राबवताना याचे काटेकोरपणे पालन करावे. सर्वसामान्य नागरिकाला त्रास होणार नाही, तो वेठीस धरल्या जाणार नाही, याचे तारतम्य बाळगावे. निरर्थक मुद्दा प्रतिष्ठेचा बनवू नये. प्रशासनाने देखील नियमांची अंमलबजावणी करतांना, सर्वांसाठी एकच नियम लागू करावा. एकाला तुपाशी आणि एकाला उपाशी असं करु नये. सण, उत्सव मग ते कुठल्याही धर्माचे असोत ते खेळीमेळीच्या आणि तणावरहित वातावरणात साजरे होण्यात खरा आनंद आहे. उत्सव साजरा करणाऱ्यांनी विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे.

**हेमंत जकाते,** अकोला

## विश्वकर्मा पूजा: शिल्प, वास्तुकला आणि तांत्रिक प्रगतीचा पावन सण



हिंदू धर्मग्रंथांमध्ये भगवान विश्वकर्मा यांना ब्रह्मांडातील पहिले दिव्य वास्तुकार, शिल्पकार आणि अभियंता (इंजिनिअर) मानले गेले आहे. ऋग्वेदापासून ते पुराणांपर्यंत त्यांच्या अद्भुत शिल्पकला कौशल्याचे आणि निर्माणांचे महिमामंडन आढळते. त्यांच्या आराधनानिमित्त साजरा केला जाणारा विश्वकर्मा पूजा हा सण भारताच्या समृद्ध औद्योगिक आणि तांत्रिक परंपरेचे प्रतीक आहे.

### १. तिथी आणि शुभ मुहूर्त

हिंदू धर्मातील बहुतेक सण चंद्र कॅलेंडरनुसार साजरे केले जातात, परंतु विश्वकर्मा पूजा ही प्रामुख्याने सूर्य कॅलेंडर (सोलर कॅलेंडर) वर आधारित असते. हा सण दरवर्षी कन्या संक्रांतीच्या दिवशी साजरा केला जातो, जेव्हा सूर्य सिंह राशीतून बाहेर पडून कन्या राशीत प्रवेश करतो. सामान्यतः ही तारीख इंग्रजी कॅलेंडरनुसार १६ किंवा १७ सप्टेंबर रोजी येते. २०२६ मध्ये हा महापर्व १७ सप्टेंबर रोजी पूर्ण श्रद्धेने साजरा केला जाईल.

### २. पौराणिक महत्व आणि दिव्य निर्माण

पौराणिक मान्यतेनुसार, भगवान विश्वकर्मा हे देवांचे राजवाडे, अस्त्र-शस्त्रे आणि दिव्य नगरांचे निर्माते आहेत. त्यांनी चारी युगांत अनेक ऐतिहासिक आणि चमत्कारी रचना निर्माण केल्या. सत्ययुग: देवांचा राजा इंद्र याच्यासाठी स्वर्ग लोक आणि त्याचे सर्वात शक्तिशाली अस्त्र 'वज्र' चे निर्माण. यासोबतच भगवान शिवांचा त्रिशूळ आणि विष्णूंचे सुदर्शन

**दिन विशेष..**

चक्रही त्यांनीच तयार केले होते.

**त्रेतायुग:** भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या निवासासाठी सोन्याच्या लंका नगरीचे निर्माण (जी नंतर रावण कडे गेली).

**द्वापरयुग:** भगवान कृष्णाच्या आज्ञेने समुद्राच्या मध्यभागी अत्यंत सुरक्षित आणि भव्य द्वारका नगरीची रचना केली.

**कलियुग (महाभारत काळ):** पांडवांसाठी वैभवशाली आणि चमत्कारी इंद्रप्रस्थ महालाचे निर्माण केले, ज्याची वास्तुकला पाहून प्रत्येक जण थक्क होत असे.

### ३. पूजा कशी साजरी केली जाते? (परंपरा आणि विधी)

विश्वकर्मा पूजा प्रामुख्याने कारखाने, औद्योगिक क्षेत्रे, वर्कशॉप, गॅरेज, कन्स्ट्रक्शन साइट्स आणि आधुनिक आयटी कंपन्यांमध्येही मोठ्या थाटामाटात साजरी केली जाते.

**साधने आणि यंत्रांची स्वच्छता:** पूजेच्या एक दिवस आधी सर्व यंत्रे, संगणक, वाहने आणि लोखंडी साधनांची नीट स्वच्छता केली जाते.

**काम स्थगित ठेवणे:** पूजेच्या दिवशी व्यावसायिक उपक्रम आणि यंत्रांचे कामकाज पूर्णपणे बंद ठेवले जाते. हे यंत्रांबद्दल आणि श्रमाबद्दल आदर व्यक्त करण्याचे एक साधन आहे.

**कलश स्थापना आणि पूजा:** कार्यस्थळांवर भगवान विश्वकर्मा यांची मूर्ती किंवा प्रतिमेची स्थापना केली जाते. त्यांना फळे, मिठाई, फुले आणि सिंदूर अर्पण केले जाते. सर्व साधनांना टिळा लावून रक्षासूत्र (मौली) बांधले जाते.

**पतंगबाजीची परंपरा:** पश्चिम बंगाल आणि पूर्व भारतातील काही भागांमध्ये या दिवशी आकाश रंगीबेरंगी पतंगांनी सजलेले असते. या दिवशी सामूहिकपणे भव्य पतंगबाजी स्पर्धा आयोजित केल्या जातात.

### ४. आधुनिक युगातील प्रासंगिकता

आजच्या तांत्रिक आणि डिजिटल युगातही विश्वकर्मा पूजेचे महत्त्व कमी झालेले नाही. हा सण आपल्याला शिकवतो की आपले साधन, यंत्रे आणि उपकरणे केवळ निर्जीव वस्तू नाहीत, तर ती आपल्या उपजीविकेचे आणि प्रगतीचे माध्यम आहेत. हा दिवस कामगार, अभियंते, शिल्पकार आणि कारागिरांच्या अथक परिश्रमांचा सन्मान करणारा भारतीय श्रम दिन आहे, जे देशाच्या आर्थिक आणि तांत्रिक विकासाचा कणा आहेत.

## गणपती Special... अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध

“गर्दीत चालणारा नाही... स्वतःची वाट निर्माण करणारा!” गणरायाच्या आशीर्वादाने आजपासून एका वेगळ्या प्रवासाची सुरुवात...

आपण Numerology मध्ये अंक पाहतो; पण त्या अंकामागचा माणूस समजून घेतो का? त्याचा स्वभाव, विचार, बोलण्याची पद्धत, Lifestyle, Career, पैसा, नाती, संघर्ष आणि यश... याच सगळ्याचा शोध घेणारी आपली मालिका—

“गणपती Special... अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध” आणि सुरुवात मुलांक १ पासून. मुलांक १ असलेली काही प्रसिद्ध व्यक्तिमत्त्वे

छत्रपती शिवाजी महाराज — १९ फेब्रुवारी
लता मंगेशकर — २८ सप्टेंबर
रतन टाटा — २८ डिसेंबर
हृतिक रोशन — १० जानेवारी
वेगवेगळ्या क्षेत्रांतील ही व्यक्तिमत्त्वं...

पण स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्याची क्षमता हा त्यांच्यात दिसणारा एक समान धागा आहे.

**मुलांक १ म्हणजे काय?**

ज्यांची जन्मतारीख १, १०, १९ किंवा २८ आहे, त्यांचा मुलांक १. अंकशास्त्रात १ हा सूर्याचा अंक मानला जातो. सूर्य दुसऱ्याच्या प्रकाशावर जगत नाही. तो स्वतः प्रकाश देतो. म्हणून मुलांक १ व्यक्तीच्या मनात अनेकदा एक भावना असते— “मला कुणीतरी पुढे नेण्याची वाट पाहायची नाही...मला स्वतः पुढे जायचं आहे.” Leadership, confidence, ambition, independence आणि स्वतःची ओळख निर्माण करण्याची इच्छा ही त्यांची मोठी ताकद. पण...याच ताकदीची दुसरी बाजूही असते.

Confidence कधी Ego होऊ शकतो.
Leadership कधी Dominance बनू शकते.
ठामपणा कधी हट्ट होऊ शकतो. महत्त्वाकांक्षा कधी अधीरता आणू शकते.

म्हणून मुलांक १ साठी जीवनाचा सुंदर धडा—

“स्वतःवर विश्वास ठेवा,पण दुसऱ्याचं ऐकण्याइतके नम्रही रहा.”

**छत्रपती शिवाजी महाराजांकडून काय शिकता येतं?**

१९ फेब्रुवारी — मुलांक १. लहान वयात स्वराज्याचं स्वप्न. समोर अनेक अडचणी; पण ध्येय त्याहून मोठं. मुलांक १ ची मानसिकता एका वाक्यात—“हे शक्य आहे का?” पेक्षा “हे शक्य कसं करायचं?” अडचणीसमोर न थांबता मार्ग शोधण्याची वृत्ती ही त्यांची मोठी ताकद. पण आयुष्यात प्रत्येक निर्णय फक्त स्वतःच्या इच्छेने घेता येत नाही—योग्य वेळी सल्ला स्वीकारणंही ताकदच आहे.

**मनाच्या आतला मुलांक १**

बाहेरून confident...ठाम...निर्णय घेणारा...

पण मनात एक इच्छा असू शकते—“माझं काम कुणीतरी ओळखावं.” कौतुकाची गरज असते, पण ती नेहमी व्यक्त केली जातेच असं नाही. म्हणून कधी कधी अतिआत्मविश्वासाच्या




मागेही स्वतःला सिद्ध करण्याची धडपड असू शकते. आणि अपयश आलं तर? बाहेरून “काही फरक पडत नाही” असं दाखवूनही ते मनाला खोलवर लागू शकतं.

**बोलण्याची Style**

मुलांक १ ची भाषा अनेकदा थेट असते—

“मी करतो.” “हे आपण करू शकतो.” “मला हे साध्य करायचं आहे.” निर्णयक्षमता ही ताकद. पण “माझंच बरोबर” हा हट्ट झाला तर तीच ताकद नात्यांमध्ये अडचण बनू शकते. Leader होण्यासाठी आवाज मोठा असण्यापेक्षा विचार मोठा असावा लागतो.

**Lifestyle आणि पैसा**

स्वतःची वेगळी Style, quality, comfort आणि individuality याकडे आकर्षण असू शकतं. Career मध्ये Business, Management, Leadership, Entrepreneurship, Administration यांसारख्या क्षेत्रांकडे ओढ असू शकते. पैसा म्हणजे त्यांच्यासाठी अनेकदा— स्वातंत्र्य आणि स्वतःचे निर्णय घेण्याची ताकद.

पण घाईचे निर्णय, impatience किंवा “आत्ताच हवं” ही वृत्ती आर्थिक नुकसान करू शकते. “रफ्तार कितनी भी अच्छी हो, दिशा सही होना ज़रूरी है।”

**लता मंगेशकर**

२८ सप्टेंबर — मुलांक १. स्वतःच्या आवाजाने आणि कर्तृत्वाने त्यांनी एक अशी ओळख निर्माण केली जी अनेक पिढ्यांच्या मनात राहिली. स्पर्धेपेक्षा स्वतःची ओळख निर्माण करणं ही मुलांक १ ची सुंदर बाजू त्यांच्या उदाहरणातून समजते.

**रतन टाटा, २८ डिसेंबर — मुलांक १.**

Leadership म्हणजे फक्त अधिकार गाजवणं नाही; शांतपणे निर्णय घेणं आणि जबाबदारी स्वीकारणंही Leadership आहे. यशासोबत नम्रता आणि मूल्यं जपणं ही मुलांक १ ची mature बाजू समजण्यासाठी त्यांचं व्यक्तिमत्त्व प्रेरणादायी आहे.

### भाग 1 – मुलांक 1 ... जन्मतारीख 1..10..19..28

**Bollywood मधील एक उदाहरण**

हृतिक रोशन — १० जानेवारी, मुलांक १. स्वतःची वेगळी ओळख आणि सातत्याने स्वतःला घडवत राहण्याची वृत्ती यासाठी त्यांचं उदाहरण देता येईल.

**प्रेम आणि नात्यांमध्ये?**

मुलांक १ व्यक्ती प्रेम करते; पण अनेकदा प्रेम शब्दांपेक्षा जबाबदारी आणि कृतीतून दाखवते. त्यांना आदर आणि appreciation महत्त्वाचे वाटतात. पण स्वतःचं म्हणणं लादण्याची वृत्ती आली तर नात्यांमध्ये ताण निर्माण होऊ शकतो. म्हणून—“जो सबको रास्ता दिखाता है, कभी-कभी वो भी अकेला होता है... चेहरे पर सूरज जैसी चमक होती है, मगर दिल को भी किसी अपने की जरूरत होती है...”

**गणरायाचा संदेश**

मोठं स्वप्न पाहा, पण अहंकाराला मोठं होऊ देऊ नका.

नेतृत्व करा, पण इतरांना कमी समजू नका. स्वतःवर विश्वास ठेवा, पण सल्ला स्वीकारण्याची नम्रता ठेवा. कारण— “सूर्य उंच असतो... पण त्याचा प्रकाश सगळ्यांसाठी असतो.”

**एक महत्त्वाची गोष्ट...फक्त** Mulank 1 आहे म्हणून प्रत्येक व्यक्ती अगदी सारखी असेल असं नाही. तुमच्या जन्मतारखेत १ किती वेळा आला आहे, यावरही अंकांची तीव्रता आणि व्यक्तिमत्त्वातील काही गुण बदलू शकतात. म्हणून फक्त “माझा Mulank काय?” एवढंच नाही... “माझ्या जन्मतारखेत कोणते अंक किती वेळा आहेत?” हेही पाहणं महत्त्वाचं आहे. म्हणूनच प्रत्येक मुलांक १ व्यक्तीची कहाणी थोडी वेगळी असते.

**आता तुमची पाळी...**

तुमचा मुलांक १ आहे का? तुमची जन्मतारीख १, १०, १९ किंवा २८ आहे का? तुम्ही यापैकी कसे आहात? Leader? स्वतंत्र विचार करणारे? थेट बोलणारे? महत्त्वाकांक्षी? थोडे हट्टी? की दुसऱ्यांचं ऐकण्यापेक्षा स्वतःचा निर्णय घेणारे? Comment मध्ये तुमचा अनुभव नक्की सांगा. आणि तुमच्या जन्म तारखेतील इतर अंकांमागची अजून खोल कहाणी जाणून घेण्यासाठी— Visit — Seema's Divine Numbers

“अंक फक्त संख्या नाहीत... प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते.”



**सीमा बक्षी**
अकोला
मो. नं. 9834571153

## राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याकरिता

# शेतकरी संघटनेचा रस्ता रोको

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अडगाव बु. :** शेतकऱ्यांच्या विविध मागण्याकरिता अडगाव बु येथे रास्ता रोको आंदोलन शेतकरी संघटनेने केले.अलनिनोचा प्रभाव हा संपूर्ण राज्यावर आहे.म्हणून संपूर्ण राज्यात कोरडा दुष्काळ जाहिर करण्यात यावा अशी मागणी शेतकरी संघटनेकडून करण्यात आली.विदर्भातील शेतकरी उध्वस्त झालेला आहे.दररोज शेतकरी आत्महत्या करीत आहे. जनतेकडे प्रपंच चालवण्याकरिता पैसे शिल्लक नाहीत.अशा बिकट परिस्थितीत.महावितरण चे अधिकारी स्मार्ट मीटर ला हत्यार करून दादागिरीने जनते कडून पैसे वसूल करत आहेत.




यामध्ये कोणतेही नियमाचे पालन होत नाही.शेतकऱ्यांचा व शेतमजुरांच्या अपमान महावितरण करीत आहे.याची नोंद प्रशासनाने घेण्यात यावी. रंभापुर ते वारखेड सिमेंट रोड होत आहे.याची मागणी जनतेने केली नव्हती. पण राज्य सरकार विनाकारण मार्ग बनवत आहे.बनवतांना बराच कालावधी लागत आहे. यामुळे कित्तेक दुर्घटना घडून लोक मृत्युमुखी पडत आहे.कंत्राटदार मनमानी काम करून जनतेला त्रास देत आहेत.केंद्रीय मंत्री गडकरी जी यांनी सिमेंट रोड ची 100 वर्षाची ग्यारंटी घेतली आहे.म्हणून दूरदृष्टी लक्षात घेता रंभापुर ते वारखेड रस्त्यात येणाऱ्या सर्वच गावात रस्ता दुभाजक देण्यात यावे जेणे करून येणाऱ्या काळात दुर्घटना कमी होतील. वन्यप्राणी शेतात घुसून शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान करीत आहेत.हिंसक वन्यप्राणी शेतकऱ्यावर हमले करीत आहेत.यावर कठोर पावले सरकार व वण्याविभागाने उचलण्याची गरज आहे.जर प्रशासन व सरकार ने गंभीर दखल न घेतल्यास जिल्ह्यात चक्का जाम आंदोलन करणार असा विचार विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकर यांनी मांडले.

या वेळी शेतकरी संघटनेचे दिनेश देऊळकार, निलेश नेमाडे,अमोल मसुरकार, रामकिशोर थुटे, नरेंद्र मानकर,रितेश देशमुख, लक्ष्मण सोलकर ,बाळू देशमुख, मकसूद मुल्लाजी, जाफर खा,धनंजय देऊळकार, पंकज इंगळे, दिनेश गिर्हे, अफजल भास्कर, राजू मोरे, अनिल कळसकर, सोपान इंगळे, अनिल कौठकर, शेख नुसरत विठ्ठल मानकर, दीपक बोबटकार, संजय ढोकणे,डॉ गोपाल रेखाते, बाला रत्नपारखी, नितीन चिम,शुभम एकघरे,अमोल भोपळे,प्रमोद नेमाडे, नागेश नेमाडे,शेख इम्रान, चंद्रकांत अनोकर,शेख नईम,अब्दुल नावेद,शेख अन्वर,सरफराज खा,शेख जहागीर,अब्दुल अतिक,नितीन हेड, मोहन खिरोडकार, मनीष निमकर्डे,गजानन राऊत,संघपाल पोहरकार, शेख इस्माईल,गोपाल बोदळे,रवी गवई,विलास इंगळे,स्वपनील देऊळकार,शेख नदीम,सुरेश सोनोने,चंद्रकांत ढोकणे, राजेंद्र तायडे,गोपाल चांडक,राजीक कुरेशी,शेख असिफ, फिरोज खा,माणिक घाटे,हरिओम व्यास,माजी जिल्हा परिषद सदस्य गोपाल कोल्हे, माजी जिल्हा परिषद सदस्य मनमोहन व्यास,महसूल विभागाकडून नायब तहसीलदार राणे,पोलीस प्रशासन कडून हिवरखेड चे ठाणेदार सचिन पाटील उपस्थित होते.

> राज्यात दुष्काळ जाहीर करा तसेच वन्यप्राण्यांचा बंदोबस्त वन्य विभागाकडून करण्यात यावा वरील मागण्या 10 दिवसात मान्य न झाल्यास गावागावात जाऊन सभा घेऊन जिल्ह्यात चक्का जाम आंदोलन करणार.
>
> **लक्ष्मीकांत कौठकर**
> विदर्भ अध्यक्ष शेतकरी संघटना

# शेतातील केळीचे पीक कापून नुकसान

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**हिवरखेड :** हिवरखेड येथील शेतकऱ्याच्या शेतातील केळीचे पीक अज्ञात व्यक्तींनी कापून तसेच शेतातील साहित्याचे नुकसान केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी अब्दुल नदीम अब्दुल अहद (वय 31, रा. बंदुकपरा, हिवरखेड, ता. तेल्हारा, जि. अकोला) यांनी हिवरखेड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली आहे.

तक्रारीनुसार, तळेगाव बु. शेतशिवारातील गट क्रमांक 395 मध्ये त्यांची शेती असून, त्यापैकी सुमारे 3 एकर क्षेत्रात 12 महिन्यांपूर्वी केळीचे पीक लावण्यात आले होते. 13 सप्टेंबर रोजी शेतात गेल्यानंतर केळीचे पीक व्यवस्थित असल्याचे त्यांनी पाहिले होते.



मात्र 15 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी सुमारे 9.30 वाजता त्यांना वैभव गावंडे यांचा फोन आला. शेतातील केळीचे पीक कोणीतरी कापून नुकसान केल्याचे समजल्यानंतर त्यांनी तातडीने शेतात जाऊन पाहणी केली. यावेळी सुमारे 200 केळीचे घड, अंदाजे 3 टन वजनाचे व किंमत सुमारे 50 हजार रुपये, कापून नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. तसेच शेतात लावलेले जुने वापरते झटका मशीन, झटका मशीनची बॅटरी व इतर साहित्याचे मिळून अंदाजे 12 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. अशा प्रकारे एकूण सुमारे 62 हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणी अब्दुल नदीम अब्दुल अहद यांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. हिवरखेड पोलिसांनी 15 सप्टेंबर 2026 रोजी गुन्हा नोंदविला असून, अहवालात भारतीय न्याय संहिता, 2023 मधील कलम 324(4) नमूद करण्यात आले आहे.

## हिंदी पंधरवडा निमित्त २० सप्टेंबर रोजी कवी संमेलन

**अकोला :** महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी कडून हिंदी पंधरवडा अंतर्गत २० सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता मेहेरबानू महाविद्यालयात कवी संमेलन आयोजिले आहे. डॉ. रामप्रकाश वर्मा, घनश्याम अग्रवाल, प्रकाश पुरोहित (पुणे), महेंद्र मालवीया, डॉ. प्रमोद शुक्ल, महेश शुक्ल, संजय खांडेकर, गोपाल मापारी, डॉ. पूनम मानकर पिसे हे कवी सहभागी होणार आहेत. संचालन आसिफ़ जारियावाला करतील. कवी संमेलनाचे निमंत्रक सचिन निंबाळकर सहनिदेशक तथा सदस्य सचिव महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी तर संयोजक विजय जानी, दिनेश कुमार शुक्ल, श्याम प. शर्मा हे आहेत.

# कासोद-शिवपूरात बिबट्याच्या हल्ल्यात गोऱ्हा ठार

वि. प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**शिवपूर :** कासोद-शिवपूर परिसरातील गट क्रमांक ८७ मध्ये मंगळवारी (दि. १५ सप्टेंबर) पहाटेच्या सुमारास बिबट्याने गोऱ्यावर हल्ला करून त्याला ठार केल्याची घटना घडली. या घटनेत शेतकरी सुरेंद्र ओमप्रकाश बोंद्रे यांचे सुमारे ५० ते ६० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले असून, गावालगत बिबट्याचा वाढता वावर पाहता ग्रामस्थांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सुरेंद्र बोंद्रे यांच्या मालकीचा गोरा शेतातील बांधाजवळ बांधलेला असताना पहाटे बिबट्याने त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात गोऱ्याचा जागीच मृत्यू झाला. पशुधन हेच उपजीविकेचे प्रमुख साधन असल्याने या घटनेमुळे बोंद्रे कुटुंबाला मोठा आर्थिक फटका बसला आहे.

विशेष म्हणजे ही घटना गावाच्या वस्तीपासून अवघ्या ५०० मीटर अंतरावर घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पहाटेच्या वेळी मानवी वस्तीच्या इतक्या जवळ बिबट्याचा वावर आढळून आल्याने शेतकरी, पशुपालक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षेबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच आमोना बिटचे वनपाल सय्यद असलम, वनरक्षक बी. एम. देवकांबळे, कु. पूनम राठोड तसेच ग्राम महसूल अधिकारी राजाभाऊ खामकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. मृत गोऱ्याची पाहणी करून नुकसानीची नोंद करण्यात आली असून, पुढील कार्यवाही सुरू असल्याचे सांगण्यात आले.



दरम्यान, वनविभागाकडून पंचनामा आणि नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू असली तरी अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. वन्यप्राण्यांचा वावर गावालगत वाढत असताना नियमित गस्त, कॅमेरा ट्रॅप, संवेदनशील भागांवर विशेष लक्ष आणि ग्रामस्थांना वेळेवर सूचना देण्यासाठी सक्षम यंत्रणा उभारण्याची गरज व्यक्त होत आहे. वन्यजीव संरक्षणाबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांच्या जीवित आणि मालमत्तेच्या सुरक्षेलाही प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. भविष्यात मनुष्यहानी किंवा अधिक पशुधनहानी होण्यापूर्वी वनविभागाने ठोस कृती आराखडा तयार करून प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

> "शेतालगत बिबट्याचा वावर वाढल्यामुळे शेतीची कामे प्रभावित झाली आहेत. पशुधन हेच आमच्या उपजीविकेचे साधन असून मोठे नुकसान झाले आहे. शासनाने तातडीने नुकसानभरपाई द्यावी."
>
> **सुरेंद्र बोंद्रे,** शेतकरी
>
> ........................
>
> "गावाला संरक्षणात्मक फेन्सिंग मिळण्यासाठी अनेक जाचक अटी असल्याचे सांगितले जाते. प्रत्यक्षात नुकसान झाल्यानंतर मदत मिळण्यापेक्षा नुकसान होण्यापूर्वी प्रतिबंधात्मक उपाययोजना होणे अधिक गरजेचे आहे. ग्रामस्थांचे जीवित आणि मालमत्ता सुरक्षित राहण्यासाठी शासनाने या अटींचा पुनर्विचार करून प्रभावी संरक्षण व्यवस्था उभारावी."
>
> **सतीश बोंद्रे,** शेतकरी, शिवपूर

# रुग्णाला थेट पंचायत समितीत आणलं..!

## आमदारांच्या सूचनेनंतरही कारवाई न झाल्याचा आरोप



**मुर्तिजापूर :** तालुक्यातील मंगरूळ कांबे ग्रामपंचायतीच्या कारभाराचा धक्कादायक प्रकार समोर आला असून, तक्रारीवर तब्बल १५ दिवस उलटूनही कारवाई होत नसल्याच्या निषेधार्थ संतप्त नातेवाईकांनी एका रुग्णाला चक्क रुग्णवाहिकेतून पंचायत समिती कार्यालयात आणून थेट गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनातच ठेवले. या प्रकारामुळे पंचायत समिती प्रशासनात एकच खळबळ उडाली.

मंगरूळ कांबे येथील भीमराव वाकोडे यांच्या घरालगत शेजाऱ्याने खत टाकले असून, त्यामध्ये विषारी औषध मिसळल्यामुळे श्वसनाचा त्रास होत असल्याचा आरोप वाकोडे कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणाची तक्रार संबंधित यंत्रणेकडे करण्यात आली. मात्र, वारंवार पाठपुरावा करूनही अपेक्षित कारवाई होत नसल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला.

प्रशासनाकडून दखल घेतली जात नसल्याने वाकोडे कुटुंबीयांनी तब्बल १५ दिवस ग्रामपंचायत कार्यालयाच्या वरांड्यातच आसरा घेत प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यानंतरही प्रश्न सुटला नसल्याने अखेर संतप्त नातेवाईकांनी रुग्णाला रुग्णवाहिकेतून थेट मूर्तिजापूर पंचायत समिती कार्यालयात आणले आणि गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांच्या दालनातच रुग्णाला ठेवण्यात आले.

**मुख्यमंत्र्यांकडे बदलीची मागणी**

गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांची गोंदिया किंवा भंडारा जिल्ह्यात बदली करण्यात यावी, अशी मागणीही काही नागरिकांनी केली आहे. मोरे यांचे मूळ गाव त्या परिसरात असल्याने ते वारंवार कुटुंबीयांना भेटण्यासाठी जात असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे त्यांना मूर्तिजापूर येथे काम करण्याची इच्छा नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

मात्र, या आरोपांची अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची वस्तुनिष्ठ चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे. रुग्णाला उपचारासाठी रुग्णालयात नेण्याऐवजी न्यायाच्या मागणीसाठी प्रशासनाच्या दालनात आणण्याची वेळ का आली, हा प्रश्न या घटनेमुळे ऐरणीवर आला आहे. आता पंचायत समिती प्रशासन या प्रकरणाची काय दखल घेते, संबंधित तक्रारीवर कोणती कारवाई केली जाते आणि वाकोडे कुटुंबीयांना न्याय कधी मिळतो, याकडे मंगरूळ कांबे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### आमदारांच्या सूचनेनंतरही कारवाई नाही?

या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर आमदार हरीश पिंपळे यांनी गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून प्रकरणाचा तातडीने निपटारा करण्याच्या सूचना दिल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र, आमदारांच्या सूचनेनंतरही संबंधित प्रकरणात ठोस कारवाई झाली नसल्याचा आरोप वाकोडे कुटुंबीयांसह उपस्थित नागरिकांनी केला.

यामुळे 'आमदारांच्या निर्देशांकडेही दुर्लक्ष का?' असा सवाल उपस्थित करण्यात येत आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी या प्रकरणाकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, पंचायत समिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबतही नाराजी व्यक्त केली आहे.

नागरिकांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप मिलिंद मोरे गटविकास अधिकारी म्हणून रुजू झाल्यापासून पंचायत समितीमध्ये नागरिकांच्या विविध समस्यांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप काही नागरिकांनी केला आहे. ग्रामपंचायत स्तरावरील प्रश्न घेऊन पंचायत समितीत येणाऱ्या नागरिकांना वेळेत न्याय मिळत नसल्याने त्यांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असल्याची नाराजीही व्यक्त करण्यात आली. दरम्यान, गटविकास अधिकारी मिलिंद मोरे यांच्याविरोधात नागरिकांमध्ये वाढत असलेल्या नाराजीची प्रशासनाने दखल घ्यावी, अशी मागणी होत आहे.

# डॉ. प्रीती कामावीसदार भाजप महिला मोर्चाच्या जिल्हा ग्रामीण सचिव पदी

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अकोला :** ज्येष्ठ समाजसेविका तथा शिक्षण तज्ञ डॉ. प्रीती विपिन कामाविसदार यांची भारतीय जनता पार्टी च्या अकोला जिल्हा ग्रामीण महिला मोर्चाचे सचिव पदावर नियुक्ती करण्यात आली आहे.



भाजप कार्यालयात संपन्न झालेल्या एका कार्यक्रमात आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे, महापौर शारदा ताई खेडकर,यांचे हस्ते त्यांना हे नियुक्ती पत्र बहाल करण्यात आले. याप्रसंगी स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल, भाजपाचे शहर अध्यक्ष जयंतराव मसने, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, माजी आमदार बळीराम सिरस्कार, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष ज्योती पुंडकर यांचे सह इतरही नेतेमंडळी प्रामुख्याने उपस्थित होते. मानसशास्त्रात डॉक्टरेट मिळविणाऱ्या डॉ. प्रीती या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्यात अग्रेसर आहेत. " यशदा " बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्षा म्हणूनही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविलेला आहे. " अमृत कलश " विद्यालयात 12 वर्षे त्यांनी मुख्याध्यापिका म्हणून उत्तम कार्य केलेले आहे. त्यांच्या या नियुक्ती कार्यक्रमात भाजपाचे उपाध्यक्ष शंकरराव वाकोडे, बुद्धिवादी भाजपा सेलचे संयोजक प्रदीप खाडे, ऍड. देवाशिष काकड, माधव मानकर, अंबादास मोहिते, संजय गोटफोडे डॉ. किशोर मालोकार, सिद्धार्थ शर्मा यांचे सह नगरसेवक, तालुका व जिल्हा पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

## श्री गजानन महाराज मंदिरात ऋषी पंचमी निमित्त भाविक तल्लीन



प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अकोला :** सहकार नगर मधील श्री गजानन महाराज मंदिरात ऋषी पंचमी निमित्त मंगळवारी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. सकाळ पासून दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. तर,

रात्री ८:०० वाजता श्री गजानन भक्तीरंग कार्यक्रम सादर झाला. सादरकर्ते डॉ. नीरज लांडे, मनीष हुडेकर, शिवम शर्मा, निनाद चतारे, अथर्व राऊत, लोकेश अवचार हे होते. डॉ. नीरज लांडे यांनी भक्ती गीते सादर केली. भाविक त्यात तल्लीन झाले होते. मंदिर संस्थानचे पदाधिकारी तसेच सदस्यांनी आयोजनासाठी योगदान दिले. परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तहसील मधील संजय गांधी निराधार कक्ष रामभरोसे

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**बार्शीटाकळी :** तहसील कार्यालयात येण्याचे वेळा पत्रक नाही का असा सवाल नागरिकांना पडला आहे. त्यातही संजय गांधी निराधार कक्ष रामभरोसे दिसत आहे.

ग्रामीण भागातील लोक तहसील मध्ये आपल्या अडचणी सोडवण्यासाठी येतात परंतु त्यांना न्याय मिळत नाही. संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्याकरिता येत आहे दुरून दुरून लोकं आपले काम सोडून तहसील कार्यालय येथे येतात पण 11-15 वाजेपर्यंत कोणताही अधिकारी व कर्मचारी ऑफिसला उपस्थित नसतो. ऑफिसचं कर्मचाऱ्यांची येण्याची वेळ काय व ऑफिस मधून घरी जाण्याची वेळ पत्रक काय हे समजणे कठीण झाले आहे. बार्शीटाकळी हे




तालुक्याचे ठिकाण असून या गावाला बरेचशे मोठमोठे खेडे जुळले आहेत. या खेळामध्ये ग्रामीण भागातील अपंग व्यक्ती निराधार व्यक्ती विधवा बाया संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्याकरिता चकरा मारत आहे. पण या गोरगरिबांना कोणीही मदत करत नाही. तहसील ऑफिस म्हणजे फक्त एक टाइमपास ऑफिस बनले आहे असा आरोप केला आहे. गोरगरिबांना कुठल्याही प्रकारची माहिती व्यवस्थित मिळत नाही व वाईडर जवळून फाईल भरून आणा असे सांगण्यात येते. वरिष्ठांनी याकडे लक्ष द्यावे तसेच सामान्यांना न्याय द्यावा अशी मागणी केली जात आहे.

## वाशिम तालुका सह. शेतकी खरेदी विक्री संस्था, मर्यादित वाशिम र.नं. 228

### आमसभेची नोटीस

दि. १०/०९/२०२६

**महोदय,**

वाशिम तालुका सहकारी शेतकी खरेदी विक्री संस्था मर्या, वाशिम र.नं. २२८ ची वार्षिक आमसभा दि.२९/०९/२०२६ मंगळवार सकाळी ११.३० वाजता मु.का. मार्केट यार्ड वाशिम येथे घेण्याचे ठरविले आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस उपस्थित राहण्याची कृपा करावी.

**सभेपुढील विषय**

१. मागील आमसभेचे प्रतिवृत्त वाचून कायम करणे.
२. संस्थेच्या सन ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ च्या कामाचा जमाखर्च पत्रक, व्यापारी पत्रक, नफातोटा पत्रक, ताळेबंद मंजुर करणे,
३. सन ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ चे वर्षाकरीता अंदाज पत्रकास मंजुरात देणे.
४. ०१/०४/२०२५ ते ३१/०३/२०२६ वर्षाचा हिशोब तपासणी दोष दुरूस्ती अहवालास मंजुरात देणे.
५. अंकेक्षणाकरीता वैधानिक लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे.
६. ताळेबंदातील जुन्या देणे, घेणे रक्कमा रिझर्व फंडाला जमा करणे.
७. मा. सभापती यांचे परवानगीने वेळेवर येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

| प्र. व्यवस्थापक | उपसभापती | सभापती |
|---|---|---|
| एन. के. कडवे | सदाशिव भगवान महाले | लक्ष्मण महादजी इंगोले |

**- : सुचना :-**

१. आमसभेच्या नियोजीत वेळी गणपूर्तीचे अभावी सभा तहकुब झाल्यास, सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी १ तासानंतर घेण्यात येईल. वरील नोटीस मधील सर्व विषय चर्चीले जातील.
२. संस्थेचे आर्थीक विवरणपत्रके संस्थेच्या व्यवस्थापकाकडे किंवा लेखापाल यांचेकडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.
३. सभासदाचे पत्त्यामध्ये फेरबदल झाला असल्यास तसेच संस्थेस कळवावे.
४. मयत सभासदांचे वारसदारांनी वारसाची नोंद करावी.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## नरेंद्रनगरातील समस्यांबाबत नगराध्यक्षांना निवेदन

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**आर्णी :** आर्णी नगर परिषद क्षेत्रातील नरेंद्रनगर परिसर विविध मूलभूत समस्यांच्या विळख्यात सापडला असून, नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिसरात विद्युत खांब व पथदिव्यांची व्यवस्था नसून, नाल्या आणि रस्त्यांचीही दुरवस्था झाली आहे. त्यामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत आहे. या समस्यांकडे नगर परिषद प्रशासन आणि संबंधित लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी नरेंद्रनगर येथील जागरूक नागरिक तथा राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त उच्च श्रेणी मुख्याध्यापक रमेश खरतडे यांनी पुढाकार घेतला. परिसरातील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या घेऊन त्यांनी संयुक्त निवेदन नगराध्यक्ष नालंदा भरणे तसेच उपाध्यक्ष निलेश गावंडे यांच्याकडे सादर केले. नरेंद्रनगरमध्ये विद्युत खांब उभारून पथदिव्यांची व्यवस्था करावी, नाल्यांचे बांधकाम करावे तसेच रस्त्यांची कामे करून नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. यावेळी नगर परिषद सदस्य रियाज शेख उपस्थित होते. नरेंद्रनगरमधील नागरिकांच्या समस्या लवकरच मार्गी लावण्यासाठी आवश्यक कार्यवाही केली.

# यवतमाळ जिल्ह्यात नियमबाह्य डीजेवर सर्जिकल स्ट्राइक

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**यवतमाळ :** गणेशोत्सव काळात सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनीप्रदूषणविषयक नियमांची पायमल्ली करणा-या आणि अवैध पद्धतीने कर्णकर्कश साउंड सिस्टीम वाजवण्याच्या तयारीत असलेल्या डीजे चालकांविरुद्ध पोलिसांनी कारवाईची धडक मोहीम उघडली आहे. पांढरकवडा व पुसद येथे पोलिसांनी केलेल्या स्वतंत्र कारवायांमध्ये तीन डीजे वाहने आणि साहित्य जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे डीजे चालकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.

गणेशमूर्ती स्थापनेच्या दिवशी, १४ सप्टेंबर रोजी पांढरकवडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करून डीजे वाजवण्याची तयारी सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तातडीने शोधमोहीम राबवून दोन कारवाया केल्या. पहिली कारवाई ग्राम पढा येथे करण्यात आली. येथे 'टाटा एस' (क्र. MH 01 CV 9978) या वाहनात दोन बेस, दोन टॉप, स्पार्क लाईट आणि इतर साउंड सिस्टीमचे साहित्य आढळून आले. याप्रकरणी चालक दुर्गादास सुरेश कुडमेथे (वय २२), वाहनमालक विशाल हनुमान राउत (वय २६), डीजे चालक पवन पुंडलिक सहारे (वय २२, रा. मोहदा) यांना ताब्यात घेण्यात आले.

दुसरी कारवाई ग्राम शामपूर तांडा येथे झाली. तेथे 'टाटा एस' (क्र. MH 02 CE 5467) वाहनातून डीजे साहित्याची वाहतूक करताना चालक प्रविण पांडुरंग सुरपाम (वय २३) व डीजे चालक धीरज रमेश राठोड (वय



### पांढरकवडा, पुसद येथून तीन वाहनांसह लाखोंचे साहित्य जप्त

२३, रा. वागदा) यांना पकडण्यात आले. दोन्ही वाहनांकडे डीजे वापराची अधिकृत परवानगी, वाहनाचे मॉडिफिकेशन प्रमाणपत्र, चालकांकडे वैध परवाना नव्हता. त्यामुळे पोलिसांनी मोटार वाहन कायद्यातील कलम २०७ अन्वये दोन्ही वाहने जप्त केली आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी (वणी) सुरेश दळवे यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार तावरे यांच्या सूचनेनुसार पोलीस उपनिरीक्षक नितीन सुशिर, सहायक फौजदार प्रमोद जुनुनकर, विलास जाधव, सचिन काकडे, राजू मुत्यालवार यांनी केली.

### पुसदमध्ये डीजे जप्त

■ पुसद शहरात गणपती आगमनाच्या मिरवणुकीदरम्यान बंदी असतानाही डीजे वाजवण्यासाठी जाणारे वाहन वसंत नगर पोलिसांनी जप्त केले. १४ सप्टेंबर रोजी दुपारी १.३० वाजता नवीन पुसद येथील 'जय श्रीराम गणेश मंडळा'कडे डीजे घेऊन जात असताना (क्र. MH 29 M 1271) हे वाहन पोलिसांच्या हाती लागले. वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये नियमांचे उल्लंघन करून बसवण्यात आलेले १० मोठे स्पीकर बॉक्स आणि बँजोचे साहित्य आढळून आले. याप्रकरणी वाहन चालक नारायण विश्वनाथ पांढरे व मालक नरेश खंडागळे (दोघे रा. अनसिंग, ता. जि. वाशीम) यांच्यावर शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून वाहन वसंत नगर पोलीस ठाण्यात आणण्यात आले. ही कारवाई परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक पूजा राठोड यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस उपनिरीक्षक सुगत पुंडगे, पोलीस हवालदार उमेश राठोड, अविनाश कदम, अरविंद चव्हाण, नरेश नरवाडे, पराग गिरणाळे, मुरलीधर पांडुळे, प्रमोद पवार, महिला पोलीस कॉन्स्टेबल कल्पना रबडे यांनी केली.

## औदुंबर नगरीत लाडक्या बाप्पाचे आगमन

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**उमरखेड :** 'गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'च्या जयघोषाने व ढोल-ताशांच्या निनादाने औदुंबर नगरीत गणरायाचे उत्साहात स्वागत करण्यात आले. सार्वजनिक गणेश मंडळांसह घराघरांत लाडक्या बाप्पाची प्रतिष्ठापना झाल्याने शहरासह तालुक्यात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.



गणेशमूर्ती घेण्यासाठी सकाळपासूनच शहरात ग्रामीण भागातील भाविकांची मोठी गर्दी झाली होती. विविध गावांतील गणेश मंडळांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते वाहनांमधून गणेशमूर्ती घेऊन जाताना दिसत होते. शहरातील प्रमुख रस्त्यांवर गणेशमूर्ती घेऊन जाणाऱ्या वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अनेक मंडळांनी पारंपरिक ढोल-ताशा पथकांच्या गजरात मिरवणुका काढून बाप्पाचे स्वागत केले. 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने शहराचा परिसर दुमदुमून गेला.

शहरातील विविध भागांत गणेश मंडळांकडून आकर्षक स्वागत कमानी, पताका, फलक आणि विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. घरांसमोर रांगोळ्या काढून गणरायाचे स्वागत करण्यात आले. नामांकित मंडळांकडून सामाजिक, ऐतिहासिक आणि पौराणिक विषयांवर आधारित आकर्षक देखावे उभारण्यात येणार आहेत.

तालुक्यात ४०० हून अधिक मंडळे

यंदा उमरखेड तालुक्यात शहर व ग्रामीण भाग मिळून सुमारे ४०० हून अधिक गणेश मंडळांची स्थापना झाल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. यापैकी २०० हून अधिक मंडळे शहरात, तर उर्वरित मंडळे ग्रामीण भागात आहेत. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विविध मंडपांमध्ये आरती व दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत आहे.

गणेशोत्सव शांततेत पार पडावा, तसेच आगमन मिरवणुकांदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक पोलिसांचे ११ अधिकारी व ५० कर्मचारी, राज्य राखीव पोलिस दलाचे एक अधिकारी व ३० कर्मचारी, लातूर पोलिस प्रशिक्षण केंद्राचे १५ कर्मचारी, तसेच २८ होमगार्ड यांच्यासह आरसीबी, एसएफ आणि इतर अतिरिक्त पथके तैनात करण्यात आली आहेत.

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी उमरखेडमध्ये भक्ती, उत्साहात पारंपरिक संस्कृतीचा सुरेख संगम पाहायला मिळाला. पुढील दहा दिवस धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांनी शहराचे वातावरण गणेशमय राहणार आहे.

## टेंभीत रेशन दुकानदाराकडून धान्य-साखर देण्यास टाळाटाळ

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**झरी-जामणी :** तालुक्यातील टेंभी गावातील रेशन दुकानदाराकडून लाभार्थ्यांना शासनाकडून मिळणारे धान्य व साखर नियमितपणे दिली जात नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत टेंभी ग्रामपंचायतीच्या सरपंचांसह ग्रामस्थांनी झरी-जामणी तहसीलदार तथा अन्नपुरवठा अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करून चौकशीची मागणी केली आहे.

टेंभी गावातील रेशन दुकानदार लाभार्थ्यांना रेशनचे धान्य व साखर देताना टाळाटाळ करीत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तसेच रेशन घेताना लाभार्थ्यांशी अपमानास्पद वागणूक केली जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

ग्रामस्थांनी दिलेल्या तक्रारीत, संबंधित दुकानदारास यापूर्वीही समज देण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही परिस्थितीत अपेक्षित सुधारणा झालेली



### ग्रामस्थांची तहसीलदारांकडे तक्रार

नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. काही लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काच्या धान्यापेक्षा कमी धान्य देण्यात आल्याचा आरोपही ग्रामस्थांनी केला आहे. एका लाभार्थ्याला पाच किलो कमी धान्य देण्यात आले. याबाबत विचारणा केल्यानंतर समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे ग्रामस्थांनी म्हटले आहे.

या प्रकारामुळे टेंभी गावातील लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. रेशन दुकानदाराच्या व्यवहाराची सखोल चौकशी करून आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, तसेच गावातील नागरिकांना त्यांच्या हक्काचे धान्य व साखर नियमित आणि योग्य प्रमाणात उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. याबाबतचे निवेदन झरी-जामणी तहसीलदार तथा अन्नपुरवठा अधिकारी यांच्याकडे देण्यात आले. निवेदन देताना अमोल जुमनाके, रमेश चिकाराम, प्रकाश मेश्राम, उमेश चिकाराम, विनोद आत्राम, अनिल गेडाम, मनोहर मेश्राम, भीमराव दडाजे, दिनेश टेकाम, अंकुश सातपुते, लक्ष्मण आत्राम, मधुकर चिकाराम, प्रभाकर मरापे, सुधाकर आत्राम, प्रविण आत्राम, मोहन मेश्राम यांच्यासह टेंभी येथील शिधापत्रिकाधारक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## गोर सेनेच्या मागण्यांना प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद

### प्रश्न मार्गी लावण्याचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांचे निर्देश

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**पुसद :** गोर सेना संघटनेने पुसद परिसरातील विविध सामाजिक व विकासात्मक प्रश्नांसाठी केलेल्या मागण्यांची प्रशासनाने दखल घेतली आहे. राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या पुढाकाराने नाईक बंगला येथे संबंधित अधिकारी आणि गोर सेना पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले.



कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रवेशद्वाराला वसंतराव नाईक यांचे नाव देणे, पुसद धरणावरील 'वसंत सागर' हे नाव पुन्हा दर्शनी भागात आणणे, शिळोना-भलंगवाडी तलावाचे खोलीकरण, पिण्याच्या पाण्यासाठी विहीर खोदणे, चोंडी येथील वसंतराव नाईक स्मारकाचा प्रश्न तसेच मांजर जवळा ते वाघजाई रस्त्याच्या मंजुरीचा प्रश्न याबाबत बैठकीत चर्चा झाली.

संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. काही कामांसाठी निश्चित कालमर्यादेत कार्यवाही करण्याचे आश्वासनही देण्यात आले.

बैठकीस राज्यमंत्री इंद्रनील नाईक, नगराध्यक्षा मोहिनी नाईक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती कौसर खान, संबंधित विभागांचे अधिकारी तसेच गोर सेनेचे तालुका पदाधिकारी उपस्थित होते.

प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर गोर सेना संघटनेने १७ सप्टेंबर रोजी नियोजित केलेले साखळी उपोषण तात्पुरते स्थगित केले आहे.

प्रशासनाने दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीकडे आता गोर सेनेचे लक्ष लागले आहे.

## वैभवच्या कलेतून साकारला नरसिंह अवतारातील श्री गणेश!

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**आर्णी :** येथील हनुमान मंदिर चौकातील गरीब व होतकरू मूर्तिकार वैभव चलने या युवकाने आपल्या कलाकौशल्यातून नरसिंह अवतारातील आकर्षक श्री गणेशमूर्ती साकारली आहे. श्री गणेश मंडळासाठी तयार करण्यात आलेली ही अनोखी मूर्ती सध्या भाविकांचे लक्ष वेधून घेत आहे.

प्रतिकूल आर्थिक परिस्थितीवर मात करत वैभवने मेहनत, चिकाटी व कल्पकतेच्या जोरावर ही कलाकृती साकारली.

पारंपरिक गणेशमूर्तीपेक्षा वेगळ्या स्वरूपातील नरसिंह अवतारातील गणेशमूर्ती पाहण्यासाठी नागरिकांची उत्सुकता वाढली आहे.



स्थानिक पातळीवरील युवकाने आपल्या कलागुणांना वाव देत साकारलेल्या या अनोख्या कलाकृतीचे आर्णीकरांकडून कौतुक होत आहे. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी मेहनत, कलेच्या जोरावर वेगळे काहीतरी घडविता येते, हे वैभवच्या कलाकृतीने दाखवून दिले आहे.

## वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांच्या दिरंगाईप्रकरणी लिपिक निलंबित

### जिल्हाधिकारी विकास मीना यांनी घेतली जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाची झडती

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**यवतमाळ :** शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांच्या प्रकरणात दिरंगाई केल्याप्रकरणी संबंधित लिपिकावर निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले. जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाला बुधवारी अचानक भेट देत त्यांनी वैद्यकीय देयक कक्षाच्या कामकाजाची पाहणी केली.



जिल्हाधिकारी मीना यांनी मागील वर्षभरातील प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकांची माहिती घेतली. यावेळी मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. विशेष म्हणजे, ही प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी सप्टेंबर महिन्यात दोन वेळा आढावा बैठका घेतल्या होत्या. त्यानंतर १७८ वैद्यकीय देयके निकाली काढण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही दोनशेहून अधिक वैद्यकीय देयकांची प्रकरणे प्रलंबित असल्याचे अचानक पाहणीदरम्यान आढळून आले. लोकसेवा हक्क कायद्यानुसार निश्चित केलेल्या कालमर्यादेत नागरिकांची व शासकीय कर्मचाऱ्यांची प्रकरणे निकाली काढणे अपेक्षित असताना संबंधित कामात दिरंगाई झाल्याचे स्पष्ट झाले.

या प्रकाराची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी विकास मीना यांनी वैद्यकीय देयकांचे काम हाताळणाऱ्या संबंधित लिपिकास तात्काळ प्रभावाने निलंबित करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## ३० वर्षांवरील प्रत्येकाची होणार आरोग्य तपासणी

### 'माझं गाव, आरोग्य संपन्न गाव' अभियान; १० डिसेंबर पर्यंत मोहीम

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**यवतमाळ :** ग्रामीण भागातील नागरिकांना आजारांचे वेळीच निदान,उपचार मिळावेत, यासाठी जिल्ह्यात 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' अभियान सुरू करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत '३० वर्षांचा पल्ला, तपासणी अन् सल्ला' ही मोहीम १ सप्टेंबर पासून सुरु झाली असून, १० डिसेंबर २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे.

या मोहिमेत जिल्ह्यातील ३० वर्षे व त्यापेक्षा अधिक वयाच्या प्रत्येक नागरिकाची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब तसेच मुख, स्तन, गर्भाशयाच्या कर्करोगासह विविध आजारांची मोफत तपासणी केली जाणार असून, तपासणीनंतर आवश्यकतेनुसार वैद्यकीय सल्ला, पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. बदलती जीवनशैली, आहाराच्या सवयींमुळे वयाच्या ३० वर्षांनंतर अनेक आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे आजार गंभीर होण्यापूर्वीच त्याचे निदान व्हावे, हा या मोहिमेचा उद्देश आहे. नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यावरही या मोहिमेत भर देण्यात आला आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांच्या निर्देशानुसार जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल खत्री यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे.

### नागरिकांनी पुढे यावे

■ निरोगी आरोग्यामुळेच समृद्ध गावाची निर्मिती होते. ३० वर्षांवरील नागरिकांमध्ये आजारांचे लवकर निदान होण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची आहे. नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता तपासणी करून घ्यावी. नागरिकांनी नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय किंवा आरोग्य शिबिरात जाऊन या मोफत तपासणीचा लाभ घ्यावा.
- डॉ. सुभाष ढोले, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ

### मोहिमेचा उद्देश

■ बदलत्या जीवनशैलीमुळे ३० वर्षे वयापुढील नागरिकांमध्ये विविध आजार बळावण्याची शक्यता असते. हे आजार प्राथमिक टप्प्यातच ओळखून त्यावर वेळीच उपचार करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.जिल्ह्यातील ३० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या प्रत्येक नागरिकाची आरोग्य तपासणी केली जाणार आहे. यामध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, मुख कर्करोग, स्तनाचा कर्करोग, गर्भाशयाचा कर्करोग यांसारख्या आजारांची मोफत तपासणी व योग्य तो वैद्यकीय सल्ला दिला जाईल.

## पाळणा दुर्घटनेतील महिलेची आ.किसनराव वानखेडे यांनी घेतली भेट

### मुख्यमंत्री सहायता निधीतून मदतीसाठी पत्र; डॉक्टरांशी उपचाराबाबत चर्चा

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**उमरखेड :** महागाव तालुक्यातील फुलसावंगी येथे पोळ्यानिमित्त आयोजित यात्रेदरम्यान पाळण्यात बसलेल्या महिलेच्या केसांना बेरिंगमध्ये अडकून टाळूसह केस निघाल्याची गंभीर दुर्घटना घडली होती. या घटनेत जखमी झालेल्या महिलेवर नांदेड येथील यशोसाई रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



घटनेची माहिती मिळताच आमदार किसनराव वानखेडे यांनी यशोसाई रुग्णालयात जाऊन जखमी महिलेची भेट घेतली. तिच्या प्रकृतीची विचारपूस करून डॉक्टरांकडून उपचारांची माहिती घेतली. तसेच जखमी महिलेला मुख्यमंत्री सहायता निधीतून तातडीने आर्थिक मदत मिळावी, यासाठी संबंधितांना पत्र दिले.

यावेळी यशोसाई रुग्णालयाचे संचालक डॉ. ऋतुराज जाधव यांच्याशी उपचाराबाबत सविस्तर चर्चा करून आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याची विनंती आमदार वानखेडे यांनी केली. मतदारसंघातील विविध रुग्णालयांत उपचार घेत असलेल्या इतर रुग्णांचीही त्यांनी भेट घेऊन प्रकृतीची विचारपूस केली. अपघातग्रस्त महिला व तिच्या कुटुंबीयांच्या या कठीण प्रसंगी आपण त्यांच्या पाठीशी असून, आवश्यक ती सर्वतोपरी मदत मिळवून देऊ, असे आश्वासन आमदार वानखेडे यांनी दिले.

**CHANGE IN NAME**

My Old Name is My Old Date Of birth is 24/03/1978 And new is 21/09/1978 (Passport No.-K4974051) Name in AYESHA TARANNUM which now I am Changing as New Name AYESHA TARANNUM SHAIKH MAZHAR Henceforth my all correspondence will be done as per my new name.
Please Consider the same.
Address-
69B, SOCIETY CHOWK FULSAVANGI, MAHAGAON, YAVATMAL, MAHARASHTRA-445230
Mobile number 8766776684

# गावठी दारू निर्मितीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई!

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**अमरावती :** अवैध गावठी हातभट्टी दारू निर्मितीविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई करून - १,६०० लिटर मोहा मास सडवा नाश व दारू निर्मितीचे साहित्य जप्त केला आहे. निकेतम कदम, पोलीस अधीक्षक यांनी अमरावती ग्रामीण जिल्हयात होणाया चोरी, घरफोडी, इत्यादी गुन्हे उघडकीस आणण्याबाबत व अवैद्य धंदे यावर कार्यवाही करणेबाबत स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांना निर्देशीत केले आहे. त्यानुसार दि 15/09/2026 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंद्यांविरुद्ध कारवाई करण्यासाठी गस्त करीत असताना मिळालेल्या गोपनीय व खात्रीलायक माहितीच्या आधारे दोन्ही ठिकाणी पंचांसमक्ष छापे टाकण्यात आला.

तरोडा शेतशिवार, मोहन वानखेडे यांच्या शेतालगत नाल्याच्या काठी आरोपी सुभाष दादाराव वानखेडे, वय 45 वर्षे, रा. जुना धामणगाव, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती हा मोहा मास सडवा टाकून गावठी हातभट्टीची दारू तयार करीत असल्याची माहिती मिळाली. पथकाने सदर ठिकाणी छापा टाकला असता आरोपी पोलीस पथक दिसताच दारू गाळण्याचे साहित्य जागीच सोडून पळून गेला. घटनास्थळी 100 लिटर क्षमतेचे 08 निळ्या रंगाचे प्लास्टिक ड्रम व लोखंडी पिंपामध्ये अंदाजे 100 लिटर, असा एकूण 900 लिटर मोहा मास सडवा, अंदाजे किंमत ₹90,000/-, तसेच दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारे लोखंडी पिंप, टोपले, प्लेट, प्लास्टिक पाईप व इतर साहित्य मिळून आले. तसेच अंदाजे 02 किलो दाणेदार युरिया खत मिळून आले.

सदर मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत₹ 90,760/-आहे. मोहा मास सडव्याचा 180 ML नमुना व युरियाचा 100 ग्रॅम नमुना CA तपासणीसाठी घेऊन सीलबंद करण्यात आला. उर्वरित 900 लिटर नाशवंत मोहा मास सडवा पंचांसमक्ष घटनास्थळी नष्ट करण्यात आला. पोलीस स्टेशन दत्तापुर हद्दीतील कारवाई

शहापूर शेतशिवार, मोहन वानखेडे यांच्या शेतालगत नाल्याच्या काठी आरोपी रविंद्र भाऊराव पडघाम, रा. जुना धामणगाव, ता. धामणगाव रेल्वे, जि. अमरावती हा मोहा मास सडवा टाकून गावठी हातभट्टीची दारू तयार करीत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. पथकाने पंचांसमक्ष छापा टाकला असता आरोपी पोलीस पथक दिसताच दारू गाळण्याचे साहित्य सोडून पळून गेला. तर पंचांसमक्ष घटनास्थळी नष्ट करण्यात आला.

# प्रा. गजानन भारसाकळे महाविद्यालयीन उत्कृष्ट शिक्षक गौरवाने सन्मानित!



प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**दर्यापूर :** श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती अंतर्गत बाभूळगांव - अकोला येथील अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हील इंजिनिअरींग विभागात सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत प्रा. गजानन रामकृष्ण भारसाकळे यांना शिक्षण संस्था स्तरावर देण्यात येणाऱ्या स्व. बी एस उपाख्य डॅडी देशमुख स्मृती महाविद्यालयीन उत्कृष्ठ शिक्षक पुरस्काराने संपूर्ण परिवारासह सन्मानित करण्यात आले. पुरस्कार वितरण समारंभाच्या प्रमुख अतिथी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ मनाली क्षिरसागर यांच्या शुभहस्ते करण्यात आलेल्या या समारंभांचे अध्यक्षपदी अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख तथा कार्यकारिणीतील पदाधिकारी सर्वश्री दिलीप बाबू इंगोले, भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, हेमंत काळमेघ, अँड गजानन पुंडकर, प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशदादा खोटरे, सुभाष बनसोड , प्राचार्य अंबादास कुलट, डॉ अमोल महल्ले, विजय ठोकळ ,संस्था सचिव डॉ वि गो ठाकरे यांचेसह विशेष सत्कार मूर्ती म्हणून महाराष्ट्र शासन शिक्षक पुरस्कार प्राप्त शासकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आशिष महल्ले इत्यादी मंडळींची मंचावर उपस्थिती होती .अकोला येथील महाविद्यालयात शिक्षण घेऊन याच अभियांत्रिकी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून सेवा देत असलेले गजानन भारसाकळे हे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात . ते याच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघटनेचे सुद्धा अध्यक्ष आहेत . संत गाडगेबाबा विद्यापीठ अमरावती यांचे द्वारे दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठेच्या संत गाडगेबाबा सामाजिक कार्य व पर्यावरण कार्य हे दोन्ही प्रतिष्ठेचे पुरस्कार एकत्रित मिळविणारे ते विद्यापीठ स्तरावर आजवर एकमेव पुरस्कारार्थी ठरले आहेत . गोरक्षण स्थापनेसह संशोधन कार्यावर राष्ट्रीय गौरव प्राप्त असणारे प्रा . गजानन भारसाकळे यांच्या सेवा कार्यावर संस्थेने उत्कृष्ट सेवा गौरव पुरस्कार देऊन शिक्का मोतर्ब केले आहे.

## थोडक्यात



भाजपा नेत्या माजी खासदार नवनीत रवी राणा यांनी सिने अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांच्या मुंबई जुहू येथील निवासस्थानी जाऊन श्री गणपती बाप्पा चे दर्शन घेतले. शेट्टी परिवाराने त्यांचे स्वागत केले.

### सराईत गुन्हेगाराविरुद्ध कारवाई

**अमरावती :** पोलीस अधीक्षक, निकेतन कदम, यांनी पोलीस स्टेशन धारणी हददीतील सराईत गुन्हेगारांवर यांचे विरुदध कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस स्टेशन धारणी हददीत राहणार सराईत गुन्हेगार इसम अर्पित संजय मालवीय वय 25 वर्ष रा. ग्राम कवळाझीरी ह.मु. होली चौक धारणी ता.धारणी जि. अमरावती ज्याच्याविरुदध विविध शरीराविरुदध चे गुन्हे धारणी पोलीस स्टेशनला दाखल असून याला तडीपार करण्यासाठी उपविभागीय अधीकारी धारणी यांचे कडे महाराष्ट्र पोलीस अधिनीयम 1951 चे कलम 56 (1) (अ) (ब) अन्वये प्रस्ताव पाठवीण्यात आला होता. त्या अनुषंगाने आज दिनांक 15/09/2026 रोजी उपविभागीय अधीकारी धारणी यांनी धारणी पोस्टे हददीतील कायदा व सुव्यवस्थेचा अनुषागाने सदर इसम अर्पित संजय मालवीय वय 25 वर्ष रा. ग्राम कवळाझीरी ह.मु. होली चौक धारणी ता. धारणी जि. अमरावती यास अमरावती जिल्हा हददीतून दि. 15/09/2026 ते पूढील 1 वर्षाच्या कालावधीसाठी तडीपार करण्याचा आदेश पारीत केला आहे व त्यास 1 वर्षासाठी अमरावती जिल्हा हददीतून तडीपार केले आहे. यापुढे देखील सामाजीक शांततेस व सुरक्षीतेस बाधा आणणा-या समाज कंटकांविरुदध धारणी पोलीस स्टेशन व अमरावती ग्रामीण पोलीस घटकातर्फे कठोर कायदेशीर कार्यवाही करण्यात येणार आहे. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधीकारी माधवराव गरुड यांचे मार्गदर्शना खाली पो.नी. अवतारसिंग चव्हाण, पो.उप.नि. नारायण धांडे, पोहेका/624 गणेश घुले, पोका/287 अनुराग कथीलकर यांनी केली आहे.

### श्याम चौक, मोची गल्लीत स्वच्छता व प्लास्टिकमुक्ती मोहीम; 12 हजारांचा दंड वसूल




**अमरावती :** महानगरपालिकेच्या वतीने श्याम चौक तसेच मोची गल्ली परिसरात स्वच्छता व प्लास्टिकमुक्त परिसर मोहीम राबविण्यात आली. महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त भाग्यश्री बोरेकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, स्वास्थ्य अधीक्षक विजय बुरे तसेच झोन क्र. २ चे सहाय्यक आयुक्त भूषण पुसतकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहिमेचे आयोजन करण्यात आले.मोहिमेदरम्यान प्रतिबंधित सिंगल यूज प्लास्टिकचा वापर, विक्री व साठवणूक यासह परिसरातील स्वच्छता आणि प्रत्येक आस्थापनामध्ये दोन डस्टबिनची उपलब्धता याबाबत तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळून आल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. साहिल ट्रेडर्स — ५,००० प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याबद्दल. आशिष मेठानी प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर आढळल्याबद्दल पाच हजार रुपये,. मंगेश गोंड १,००० दोन डस्टबिनचा वापर आढळून न आल्याबद्दल. फिरोज खान १,०००: दोन डस्टबिनचा वापर आढळून न आल्याबद्दल. या कारवाईतून एकूण १२,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. मोहिमेदरम्यान प्लास्टिक नोडल अधिकारी ए. के. गोहर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक श्रीकांत डवरे, तसेच स्वास्थ्य निरीक्षक सचिन सैनी, मिथुन वाघमारे, शक्ती पीवाल आणि पवन चावरे यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. शहरातील स्वच्छता राखण्यासोबतच प्रतिबंधित प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले.

# बडनेरा पोलीसांनी केली शस्त्र घेवुन फिरणाऱ्या आरोपीस अटक

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

अमरावती : शस्त्र घेवुन फीरणा-या आरोपीस बडनेरा पोलिसांनी अटक केली आहे. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना मिळालेल्या गुप्त माहीतीवर पंचा समक्ष जावुन पाहाणी केली असता, आरोपी प्रज्वल संजय कैथवास वय-23 वर्ष रा.भगतसिगं चौक, जुनि वस्ति बडनेरा अमरावती याचे जवळ एक लोखंडी स्टीलची मुठ असलेली लोखंडी तलवार एकुण लांबी 28 इंच पातेची लांबी- 21 इंच पात्याची रुदी-02.05 इंच एका बाजुला धारदार निमुळते टोक असलेली मुठीची लांबी- 07.00. इंच, कि.अ.1000/- रुचा माल जप्त करण्यात आला. त्याने त्याचे जवळ घातक शस्त्र बाळगुन मिळुन आल्या वरुन त्याचे विरुध्द अपराध क्र. 597/2026 कलम-4/25 आर्म ॲक्ट 135 मपोका नुसार गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई केली.

# कत्तलीकरीता बांधुन ठेवलेले 7 गोवंश जप्त

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**धारणी :** कत्तलीकरीता बांधुन ठेवलेली गोवंश जातीचे 7 जनावरे किंमत अंदाजे 1,20,000/ रु ची जप्त केली. धारणी पोलिसांनी ही कारवाई केली. निकेतन कदम, पोलीस अधिक्षक यांनी अवैदय धंदयावर कारवाई करणे बाबत तसेच अवैध गोवंश जातीचे जनावरांचे वाहतुक, कत्तल करुन मास विक्री करणा-या आरोपी विरूध्द धडक कारवाई करण्याचे आदेशित केले आहे. त्या अनुषंगाने 14/09/2026 रोजी ठाणेदार अवतारसिंग चव्हान यांना मिळालेल्या गोपनिय माहीतीच्या आधारे, अज्ञात आरोपीने गोवंश जातीचे जनावरांची कत्तल करण्याचे उददेशाने खा-या टेंभरु गावात बाधुन ठेवलेली आहेत. अशा बातमी वरुन ग्राम खा-या टेंभरु येथे जावुन विचारपुस केली असता सदर गावात एका ठिकाणी 5 व दुस-या ठिकाणी 2 अशी एकुण कत्तली करीता घेवुन जाण्याचे उददेशने बांधुन ठेवलेली गोवंश जातीचे 7 जनावरे किंमत अंदाजे 1,20,000/ रु ची जप्त करण्यात आली. साक्षीदारांना विचारपुस केली असता शेख समीर शेख गफफार, रा. धारणी याने दिनांक 13/09/2026 चे रात्री 09/00 वा ते 09/30 वा दरम्यान सदर गोवंश जनावरे ही कत्तल करण्याचे उददेशाने बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी शेख समीर शेख गफफार, रा.धारणी, ता.धारणी, जि. अमरावती याचे विरुदध पो. स्टे धारणी येथे दिनांक 14/09/2026 रोजी कलम 5, 5 (बी) 9, 11 महाराष्ट्र पशुसंरक्षण अधिनियम 1976, कलम 11(3) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम 1960 प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# जिल्ह्यात तडीपारीच्या 163 प्रकरणांचा निपटारा!

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

## 10 प्रलंबित प्रकरणांवर आज सुनावणी



**अमरावती:** जिल्ह्यातील गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलीस आणि उपविभागीय दंडाधिकारी प्रशासनाकडून वेगाने कायदेशीर प्रक्रिया राबवली जात आहे. विविध उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत एकूण 163 तडीपारीची प्रकरणे निकाली काढण्यात आली असून 10 प्रलंबित प्रकरणांवर बुधवारी, 16 सप्टेंबर रोजी याबाबत अंतिम आदेश जारी होणार आहे. यासंदर्भात पोलीस विभागने जारी केलेल्या अहवालानुसार, कलम 163(2) अंतर्गत एकूण 105 प्रकरणे प्राप्त झाली होती, ती सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. तर कलम 56 अंतर्गत एकूण 60 प्रकरणे प्राप्त झाली होती, त्यापैकी 54 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत.

दर्यापूर उपविभागाअंतर्गत कलम 163 अंतर्गत 10 आणि कलम 56 अंतर्गत 4 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. दर्यापूर मधील 2 प्रकरणे खारिज करण्यात आली असून कलम १६३ अंतर्गत प्रलंबित 10 प्रकरणांवर आज, 16 सप्टेंबर 2025 रोजी अंतिम आदेश होणार आहेत.अचलपूर उपविभागात कलम 56 अंतर्गत 38 प्रकरणे प्राप्त झाली होती, यातील 36 प्रकरणे निकाली काढण्यात आली असून २ प्रकरणे प्रलंबित आहेत. चांदुर रेल्वे उपविभागात कलम 56 अंतर्गत 5 पैकी 4 प्रकरणे निकाली काढण्यात आली असून 1 प्रकरण प्रलंबित आहे.

झाडा (ता. धामणगाव रेल्वे) येथील एक प्रकरण फेरचौकशी अहवालासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी चांदुर रेल्वे यांच्याकडे प्रलंबित आहे. मोर्शी येथे कलम 163 अंतर्गत 7 आणि कलम 56 अंतर्गत 8 प्रकरणे पूर्णपणे निकाली काढण्यात आली आहेत. धारणी उपविभागात कलम 56 अंतर्गत दाखल एक प्रकरण निकाली काढण्यात आले. तिवसा आणि भातकुली येथे कलम 163 अंतर्गत सर्व 88 प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. तर कलम 56 अंतर्गत प्राप्त 2 प्रकरणांपैकी 1 निकाली काढण्यात आले असून, प्रलंबित 1 प्रकरणावर आज, 16 सप्टेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

# मोगरा-टिटवा शिवारात वाघाचे ठसे; शेतकऱ्यांमध्ये दहशत!

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**चांदुर रेल्वे :** मौजा मोगरा व मौजा टिटवा शिवारात वाघाच्या ठशांनी खळबळ उडाली आहे. मंगळवारी सकाळी सुमारे ८ वाजता स्वप्निल प्रमोद थेटे यांना शेताच्या रस्त्यावर वाघासदृश पंजाचे ठसे आढळले. या घटनेने परिसरात भीतीचे सावट पसरले आहे.

घटनेची माहिती मिळताच सादिक जी. शहा, वैभव कचवे, पंकज बनसोड यांच्यासह नागरिकांनी एकमेकांशी संपर्क साधला. प्रवीण भाऊ घुईखेडकर यांनी तातडीने पोलिस व वनविभागाला कळविले. ठशांचे छायाचित्र वनविभागाला पाठविल्यानंतर वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी व तळेगाव पोलिस स्टेशनची टीम घटनास्थळी दाखल झाली.

वनकर्मचाऱ्यांनी ठशांची पाहणी व शहानिशा केली. प्राथमिक पाहणीत हे ठसे वाघ किंवा बिबट्यासारख्या मोठ्या वन्यप्राण्याचे असल्याचे सांगण्यात आले. आदल्या रात्री सुरेंद्रजी कोपरकर यांच्या शेतातील जनावरांवर वन्यप्राण्याने हल्ला करून एका जनावराची शिकार केल्याची माहितीही समोर आली आहे.

या पार्श्वभूमीवर मोगरा व टिटवा शिवारातील शेतकऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. माजी आमदार वीरेंद्र भाऊ जगताप यांनी घटनास्थळी उपस्थित राहून परिस्थितीची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी वनविभागाने तातडीने गस्त वाढवावी, कॅमेरा ट्रॅप लावावेत आणि वन्यप्राण्याचा शोध घेऊन योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. घटनास्थळी स्वप्निल थेटे, पवन कोपरकर, पिंटू कोपरकर, मुकुंद काकडे, प्रवीण भाऊ घुईखेडकर, सुरेंद्र कोपरकर, प्रशांत दाऊतपुरे, प्रशांत देशमुख, मनोहर मारबदे हरिहर पाटील, शिंगारे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

दरम्यान, ठसे नेमके वाघाचे की, बिबट्याचे, याबाबत वनविभागाचा अधिकृत अहवाल महत्त्वाचा ठरणार आहे.

# पवित्र पोर्टल शिक्षक भरतीत अस्पष्टता; जिप सीईओ यांचा मनमानी कारभार?

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अमरावती :** जिल्हा परिषद अमरावतीच्या पवित्र पोर्टलमार्फत करण्यात आलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेत पेसा व बिगर पेसा पदांबाबत तसेच नियुक्तीनंतरच्या बदलीच्या नियमांबाबत उमेदवारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. पवित्र पोर्टलवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या भरती जाहिरातीत संबंधित पदे पेसा क्षेत्रातील आहेत अथवा पेसा क्षेत्रातील पदावर नियुक्ती झाल्यानंतर विशेष बदली निर्बंध लागू राहतील, याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात आला नसल्याचा उमेदवारांचा आरोप आहे. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांनी पवित्र पोर्टलवर उपलब्ध असलेल्या पदांच्या आधारे अर्ज करून पसंतीक्रम भरला. मात्र, निवडीनंतर सर्व उमेदवारांना पेसा क्षेत्रातील पदांवर नियुक्ती देण्यात आली असून, नियुक्ती आदेशामध्ये पेसा क्षेत्रासाठी नियुक्ती झाल्याने अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुका वगळता इतर तालुक्यात बदली मागता येणार नाही, अशी अट नमूद करण्यात आली आहे. यामुळे उमेदवारांनी प्रश्न उपस्थित केला आहे की, जर या नियुक्तीमुळे भविष्यातील बदलीवर इतका महत्त्वाचा निर्बंध लागू होणार होता, तर त्याचा स्पष्ट उल्लेख भरतीच्या जाहिरातीत व पवित्र पोर्टलवरील पदांच्या माहितीत आधीच का करण्यात आला नाही? उमेदवारांच्या मते, अशा महत्त्वाच्या सेवा अटीची माहिती उमेदवारांना अर्ज करण्यापूर्वीच स्पष्ट असणे आवश्यक होते. विशेषतः खुल्या प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांना पेसा क्षेत्रातील पदांवर नियुक्ती मिळाल्यानंतर त्यांच्या भविष्यातील बदलीच्या संधींबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. पेसा क्षेत्रातील नियुक्ती म्हणजे आयुष्यभर पेसा क्षेत्रातच सेवा करावी लागणार का, तीन वर्षांनंतर नियमित शिक्षक झाल्यानंतर बदलीचे नियम काय असतील, तसेच धारणी व चिखलदरा या दोन पेसा तालुक्यांमध्ये जीवन कसे काढावे, असे प्रश्न उमेदवारांकडून उपस्थित करण्यात येत आहेत. उमेदवारांचे म्हणणे आहे की, भरतीच्या जाहिरातीत स्पष्ट माहिती न देता नियुक्ती आदेशाच्या वेळी नवीन किंवा अधिक कठोर अट समोर आल्याने उमेदवारांच्या पसंतीक्रमाच्या निर्णयावर परिणाम झाला आहे. त्यामुळे जाहिरात, पवित्र पोर्टलवरील पदांची माहिती आणि नियुक्ती आदेशातील अटी यामध्ये सुसंगती असणे आवश्यक आहे. दरम्यान, इतर जिल्ह्यांतील पेसा शिक्षकांच्या नियुक्ती आदेशांमध्ये बदली व तीन वर्षांनंतर नियमित पदासंदर्भातील अटी वेगवेगळ्या पद्धतीने नमूद असल्याचे उमेदवारांचे म्हणणे आहे. त्यामुळे अमरावतीच्या नियुक्ती आदेशातील अट क्र. 5 चा नेमका शासन निर्णय व कायदेशीर आधार कोणता, तसेच ही अट भरतीच्या जाहिरातीत स्पष्टपणे का नमूद करण्यात आली नाही, याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने लेखी स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी उमेदवारांकडून करण्यात येत आहे. पवित्र पोर्टलवर भरतीपूर्वीच पदाचे क्षेत्र (पेसा/बिगर पेसा), नियुक्तीनंतरचे बदली निर्बंध आणि भविष्यातील सेवा अटी स्पष्टपणे नमूद कराव्यात. तसेच सध्याच्या नियुक्ती आदेशातील अट क्र. 5 बाबत उमेदवारांना अधिकृत व लेखी स्पष्टीकरण द्यावे.

# 'कोडफोर्ज-26' राष्ट्रीय हॅकाथॉनमध्ये पोटे अभियांत्रिकीच्या मोरेला द्वितीय पुरस्कार



प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अमरावती:** येथील पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग (CSE) विभागाच्या विद्यार्थ्यांनी पुसद येथे आयोजित करण्यात आलेल्या 'कोडफोर्ज-२६' या राष्ट्रीय स्तरावरील हॅकाथॉन स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत तृतीय वर्षाचा विद्यार्थी प्रणय मोरे याने द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला.

ही राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धा बाबासाहेब नाईक पुसद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुसद येथे आयोजित करण्यात आली होती. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग नोंदविला. स्पर्धेत प्रणय मोरे याने आपल्या तांत्रिक कौशल्याचे आणि नावीन्यपूर्ण विचारांचे प्रभावी सादरीकरण करत द्वितीय पुरस्कार मिळविला.

प्रणय मोरे याच्या या यशाबद्दल पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राचार्य डॉ. पी. एम. जावंदिया, कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. व्ही. बी. गडीचा, सहाय्यक विभागप्रमुख प्रा. एम. एस. बुरंगे तसेच विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले. तसेच त्याच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.





# कोरडा दुष्काळ जाहीर करण्यासाठी शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा!



## हेक्टरी ५० हजार रूपये द्या -आ.रोहीत पवार

• सिटी न्युज ब्युरो @कारंजा •

कारंजा आणि मानोरा तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० तर शेतमजुरांना २५ हजार मदतीसह इतर मागण्यांसाठी शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. या मोर्चात आमदार रोहित पवार यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी बांधव सहभागी झाले होते.



वाशिमच्या कारंजा आणि मानोरा तालुक्यात मागील ४५ दिवसापासून पावसाने दडी दिली आहे. त्यामुळे खरीप हंगाम धोक्यात आला आहे.तर पिक अक्षरशः वाळून गेली आहेत. कारंजा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी दुबार पेरणी करून पेरणी केलेले सोयाबीन आता वाळल आहे. त्यामुळे शेतकरी अक्षरशः हतबल झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर कोरडा दुष्काळ, सरसकट कर्जमाफी आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसंदर्भात महाविकास आघाडीच्या वतीने भव्य शेतकरी आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आलं असून, हा मोर्चा राष्ट्रवादीचे शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांच्या नेतृत्वात काढण्यात आला .

या मोर्चाची सुरुवात गायक पाटणी यांच्या कार्यालयापासून करून तहसील कार्यालय कारंजा येथे निवेदन देऊन मोर्चाचा समारोप करण्यात आला. या मोर्चात आमदार रोहित पवार यांच्यासह गायक पाटणी , महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच शेतकरी बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



### आ .रोहीत पवार यांनी नुकसान ग्रस्त भागाची पाहणीसाठी दुचाकीवरून केला प्रवास

कारंजा तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागाची पाहणी करताना आमदार रोहित पवार यांनी शेतकऱ्यांसोबत थेट संवाद साधला. कार्यकर्त्यांच्या जिद्दीमुळे धामणी गावात पोहोचण्यासाठी रोहित पवार यांनी चक्क शेतकऱ्यासोबत दुचाकीवरून प्रवास केला. त्यानंतर धामणी ग्रामपंचायतीत पोहोचून ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

## थोडक्यात

### राष्ट्रवादीच्या रिसोड शहराध्यक्षपदी गोपाल मगर



• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिसोड राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) रिसोड शहराध्यक्षपदी गोपाल विठ्ठलराव मगर यांची नियुक्ती करण्यात आली. वाशीम जिल्हाध्यक्ष चंद्रकांतदादा ठाकरे यांच्या हस्ते मगर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

सर्वसामान्यांच्या न्याय्य हक्कांसाठी ठामपणे उभे राहू. नागरिकांना सोबत घेऊन पक्षसंघटना अधिक मजबूत करू, असा निर्धार गोपाल मगर यांनी व्यक्त केला.यावेळी जिल्हा पक्ष प्रवक्ते गजानन पाटील आरू, तालुकाध्यक्ष तेजराव पाटील वानखेडे, श्रावण जमदाडे, अमर कांबळे, ओबीसी प्रदेश विभागाचे अलताफ घनकर, युवा तालुकाध्यक्ष प्रभाकर पाटील सरकटे, शहर महामंत्री गोपाल मोरे, गजानन बाजड, भारत गुंजकर, सदाशिव कांबळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.गोपाल मगर यांच्या नियुक्तीमुळे रिसोड शहरातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनेला नवी दिशा आणि बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. मात्र ही नवी जबाबदारी केवळ पदापुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष जनतेच्या प्रश्नांवर किती प्रभावीपणे उतरते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

### टि.सी हरवली...

माझी, राणी नारायण खिल्लारी, या नावाची इयत्ता १२ बारावी पासची टि.सी. गोरेगाव ते वाशिम प्रवास करताना परिसरात हरवली आहे. टि.सी.कोणास सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून देणे ही नम्र विनंती..

**संपर्क :-** ९०११९६६७७०

**संतोष मोरे**

रा.घोटा ता. रिसोड जि. वाशिम

# रिल्सच्या नव्हे, तर सर्वच प्रकरणाची चौकशी करा निलंबीत नव्हे, तर बडतर्फ करा!

## आ. रोहीत पवार यांची मागणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

वाशीमच्या रिसोड येथील तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी तहसील कार्यालयात रिल्स शूट करून वैयक्तिक इन्स्टग्रामवर अकाउंटवर प्रसिद्ध केली होती .या रिल्स प्रकरणी नव्हे तर त्यांच्या कार्यकाळातील सर्वच प्रकरणाची चौकशी करून तहसीलदार यांना निलंबित करून चालणार नाही . तर बडतर्फ करून त्यांना घरी पाठविले पाहिजे. अशी मागणी आ.रोहित पवार यांनी केली आहे .

शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार दि. १५ रोजी शेतकरी आक्रोश मोर्चा निमित्त वाशिमच्या कारंजा दौऱ्यावर आहेत. दरम्यान रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी तहसील कार्यालयात शूट करून नव्हे तर त्यांनी त्यांच्या कार्यकाळात शेतकऱ्यांना त्रास देवून कामे केल्याचा संताप व्यक्त होत आहे.त्यानंतर महसूल विभागाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत तहसीलदार तेजनकर यांच्या रील शूटसह त्यांच्या संपूर्ण कामकाजाची चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांना देण्यात आले आहे.मात्र यावर अद्यापही निर्णय आला नाही.त्यामुळे तहसीलदाराच्या रील शूटप्रकरणी आमदार रोहित पवार यांना प्रश्न केले असता,रिल्स शूट करणे किंवा पाहणे हा मुर्खपणा आहे. त्यापैशाही लाखो रूपये पगार असूनही शेतकऱ्यांची व सामान्य नागरिकांची कामे सहजासहजी शासकीय कार्यालयात होत नाही त्यांना त्रास दिल्या जातो, प्रत्येक कामासाठी आर्थिक देवाण घेवाण केल्या जाते. अशा अधिकाऱ्यांना निलंबित नाही,तर बडतर्फ करून घरी पाठविले पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केली आहे.



### वसुलीसाठी सर्व एकत्र, दलालांच्या हातात सुत्र...

चांगले काम करणारे अधिकारी जनतेच्या मनात स्थान निर्माण करतात. जनताही त्यांच्यासाठी वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरते. आणि ते जनतेच्या मनातील रियल स्टार बनतात. रिसोड तहसील कार्यालयातील दलालांचा सुळसुळाट झाला आहे. कोणतेही काम करण्यासाठी दलालांचाच आधार घ्यावा लागतो. पैशाशिवाय अन् दलालांच्याशिवाय काम होत नसल्यामुळे जनता त्रस्त झाली आहे. त्यामुळे रील ऐवजी तहसील कार्यालय दलालाच्या वसुली मुक्त करून रियल स्टार बनण्याची गरज आहे. तहसीलदारांना जवळच्याच दललांनीच बदनाम केले आहे.




### पैसे न घेता काम झालेली व्यक्ती दाखवा, अन् बक्षीस मिळवा...

संविधानाने दिलेल्या अधिकाराचा योग्यरित्या वापर करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे तहसीलदाराचे कार्य आहे. तसेच महसूल विभागाचा कारभार सांभाळत असताना प्रशासनाने तहसीलदाराला तालुका दंडाधिकारी म्हणूनही अधिकार प्रदान केले आहेत. तालुका दंडाधिकारी म्हणजेच न्यायदानाचे कार्य सुद्धा तहसीलदाराकडे प्राप्त झालेले आहे. आपल्या पदाची प्रतिष्ठा सांभाळण्याचीसुद्धा जबाबदारी प्रत्येक अधिकात्याची असते. मात्र त्यांच्याच कार्यालयात सर्वसामान्यांची कामे पैसे दिल्याशिवाय होत नाहीत. त्यामुळे सहजासहजी काम झालेली व्यक्ती दाखवा अन् बक्षीस मिळवा असे म्हणण्याची वेळ आली आहे. तहसील कार्यालयातील सर्वच अधिकारी व कर्मचारी दलालामार्फत आर्थिक देवाण घेवाण करूनच सर्वसामान्यांचे काम करीत असल्याच्या तक्रारी आहेत. तहसीलदार मॅडमच्या रिल्सचे सर्वसामान्य जनतेला काहीच घेणे देणे नाही. जनतेचे काम होणे हे महत्वाचे आहे. आर्थिक देवाण घेवाणी शिवाय तहसील कार्यालयात काम झाल्याची व्यक्ती दाखवा अन् बक्षीस मिळवा असे म्हणण्याची वेळ येत आहे.


६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
मंगळवार दि. ८ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
आर्थिक देवाण-घेवाणीतून कामाचा भार...
तहसीलदार बनल्या 'रिल्स स्टार'!
कार्यालयातच रील शूट करून शासकीय नियमांना पायदळी तुडवत 'चमकोगिरी'

प्रत्येक कामासाठी आर्थिकतेचे अवलंबन, सर्व प्रकरणाची चौकशी करून करा निलंबन!
* शासकीय खुर्चीवर बसून शासनाच्या आदेशाला केराची टोपली * रिल स्टार तहसीलदाराची राज्यभर चर्चा

सिटी न्यूज सुपरफास्ट
गुरूवार दि. १० सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
तहसीलदार मॅडम... 'रिल्स स्टार' नव्हे; तर 'रियल स्टार' बना!
रिल्स मुळे नव्हे तर तहसील कार्यालयातील दलाच्या वसुलीमुळे जनता हैराण
• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •
चांगले काम करणारे अधिकारी जनतेच्या मनात स्थान निर्माण करतात. जनताही त्यांच्यासाठी वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरते. आणि ते जनतेच्या मनातील रियल स्टार बनतात. रिसोड तहसील कार्यालयातील दलालाच्या वसुलीमुळे जनता

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com
बातमी खास, दखल हमखास, सिटी न्युज सुपरफास्ट
रिल्सचे प्रकरण नाममात्र, सर्वच प्रकरणाच्या चौकशीचे सत्र, सचिवाचे आयुक्तांना पत्र!
तहसीलदाराच्या अडचणीत वाढ, अव्वर सचिवांकडून विभागीय आयुक्त
काय आहे प्रकरण अन् आदेशाचे धोरण...
*केवळ रील प्रकरणाचीच नव्हे तर तहसीलदार म्हणून केलेल्या संपूर्ण कारभाराची होणार चौकशी.
*चौकशीसाठी विशेष पथक गठीत करण्याचे निर्देश.
पैसे न घेता काम झालेली व्य... दाखवा, अन् बक्षीस मिळवा

## कुकसा लघु प्रकल्पात १८ टक्के जलसाठा; विभागाने घेतल्या नोटा...

# समृद्धी महामार्गाला पाणी उपसण्याचा दिला वाटा!

• प्रभाकर नाईकवाडे @ केनवड •

धरणात पाणी केवळ १८ टक्केष्ठ शेतकऱ्यांसमोर खरीप आणि रब्बीचे संकटष्ठ भविष्यात पिण्याच्या पाण्याचीही चिंता; मात्र याच मर्यादित जलसाठ्यातून समृद्धी महामार्गालगतच्या झाडांसाठी रात्रंदिवस पाणीउपसा सुरू असल्याने कुकसा लघु प्रकल्पाच्या पाणीवापरावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कुकसा लघु प्रकल्पात सद्यस्थितीत केवळ १८ टक्के जलसाठा उपलब्ध असल्याने परिसरातील शेतकरी आणि नागरिकांच्या चिंतेत वाढ झाली आहे. मागील दीड महिन्यापासून पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, तूर यासह खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक भागांत पिके सुकू लागल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.यंदाच्या खरीप हंगामाची चिंता कायम असतानाच आता आगामी रब्बी हंगामासाठी पाणी उपलब्ध राहणार का, हा प्रश्नही महत्त्वाचा ठरत आहे. अशा परिस्थितीत कुकसा प्रकल्पातील उर्वरित जलसाठा शेतकऱ्यांसाठी आणि भविष्यातील पिण्याच्या पाण्यासाठी किती काळ पुरेल, याबाबत नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.



**१८ टक्के जलसाठा; तरीही पाणीउपसा सुरूच**

कुकसा लघु प्रकल्पातील उपलब्ध पाण्यातून समृद्धी महामार्गालगतच्या झाडांना पाणीपुरवठा करण्यासाठी पाणी उपसा केला जात असल्याचे स्थानिक शेतकरी व नागरिकांचे म्हणणे आहे. हा उपसा दिवस-रात्र सुरू असल्याचा दावाही करण्यात येत आहे.मर्यादित जलसाठ्याच्या पार्श्वभूमीवर या पाणीउपशाबाबत परवानगी कोणाची, पाणीउपशाचे प्रमाण किती आणि त्यावर नियंत्रण कोणाचे, हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक शेतकऱ्यांकडून प्रशासनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. जलसाठा कमी असतानाही पाणीउपशाला परवानगी देण्यात आली असेल, तर त्यामागील नियम व निकष काय आहेत? तसेच पाणीउपशामुळे प्रकल्पातील जलसाठ्यावर किती परिणाम होणार आहे, याची प्रशासनाने माहिती द्यावी, अशी मागणी होत आहे.



**खरीप हातातून; आता रब्बीची आस**

अत्यल्प पावसाच्या भरोशावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने पेरणी केली. मात्र पिकांच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर पावसाने पाठ फिरवल्याने अनेक ठिकाणी सोयाबीनची पाने करपली असून तूर पिकावरही परिणाम दिसून येत आहे. अशा परिस्थितीत कुकसा लघु प्रकल्पातील १८ टक्के जलसाठा हा परिसरासाठी महत्त्वाचा आधार ठरत आहे. त्यामुळे या पाण्याचे नियोजन करताना शेती, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याची गरज यांचा विचार करण्याची मागणी होत आहे.

**गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला तर?**

सध्याचा पाणीउपसा असाच सुरू राहिला आणि आगामी काळात समाधानकारक पाऊस झाला नाही, तर परिसरातील गावांच्या पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याची गरज आहे. समृद्धी महामार्गावरील झाडांना पाणी देण्यासाठी पर्यायी व्यवस्था करता येते का? याचाही प्रशासनाने विचार करावा, अशी मागणी होत आहे.

**प्रशासनाने आता वस्तुस्थिती स्पष्ट करावी**

कुकसा लघु प्रकल्पातील सध्याचा जलसाठा, सुरू असलेला पाणीउपसा, त्यासाठीची परवानगी आणि दररोज उपसल्या जाणाऱ्या पाण्याचे प्रमाण याबाबत संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. १८ टक्के जलसाठा असताना पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा आहे. आज उपलब्ध पाण्याचे नियोजन केले नाही, तर उद्या शेतीसोबतच गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर होऊ शकतो.त्यामुळे समृद्धी महामार्गासाठी सुरू असलेल्या पाणीउपशाचा तातडीने आढावा घ्यावा, उपलब्ध जलसाठा भविष्यासाठी सुरक्षित ठेवावा आणि कुकसा प्रकल्पातील पाणीवापराबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# रिसोड बस स्थानक बनले चिखल-खड्ड्यांचे माहेरघर.. !

## विकासकामांची संथ गती ; प्रवासी त्रस्त

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

वाशीम जिल्ह्यातील एक महत्त्वाची बाजारपेठ व शैक्षणिक केंद्र असलेल्या रिसोड शहराचे एसटी बस स्थानक सध्या विकासकामांच्या नावाने 'नरकयातनां'चा अनुभव प्रवाशांना देत आहे. अत्यल्प पावसानेसुद्धा बस स्थानकासमोरच तलावाचे स्वरूप दिसून येत आहे.

याबाबत अधिक असे की, रिसोड बस स्थानकांचे नव्याने बांधकाम वर्षापासून सुरू आहे. काम संथगतीने सुरू असल्याने जुन्या स्थानकासमोर बस उभ्या राहतात, बाजूला पत्र्याचे कुंपण केल्याने सध्याची जागा बस व प्रवाशांसाठी अपुरी पडत असल्याचे चित्र आहे. स्थानकाच्या मधोमध मोठा खड्डा पडला तर अत्यल्प पावसातही त्याला तलावाचे रूप आले आहे. रिसोड मधून नाशिक,लातूर, अक्कलकोट, हिंगोली, नांदेड, परभणी, पंढरपूर, संभाजीनगर, बुलढाणा, अकोला, पुणे, नागपूर लांबपल्ल्यासह आखुड पल्ल्याच्या



बस असंख्य प्रवासी घेऊन दररोज धावत असतात. मधोमध साचलेल्या गढूळ पाण्यामुळे , प्रवाशी,व्यापारी यांना नाहक त्रास होत आहे. सध्या प्रवाशांना पिण्याचे पाणी, सुलभ शौचालयही उपलब्ध नाही. साचलेल्या पाण्यामुळे पादचारी, दुचाकी व ऑटोचालकांसह बस चालकालाही यातून वाट काढणे अवघड झाले आहे. आधीच महागाईने सर्वसामान्यांचे कंबरडे मोडले असताना तिकीट दरही गगनाला भिडले आहेत. नियमित तिकीट दर भरूनही प्रवाशांना मूलभूत सुविधांपासून प्रवासी नागरिक वंचित राहत आहेत. कंत्राटदारांच्या कासवगती व मनमानी कारभारामुळे त्यावर अंकुश ठेवण्यात एसटी प्रशासनही अपयशी ठरून त्यांच्याही भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.





# श्रींचा पुण्यतिथी उत्सव उत्साहात साजरा

## दोन दिवसांत एक लाख भाविकांनी घेतले श्रींचे दर्शन , चोख पोलीस बंदोबस्त.



प्रतिनिधी १६ सप्टेंबर

शेगांव : श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव (पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.) श्री संस्थानव्दारे ११६ वा श्री पुण्यतिथी उत्सव दि.१२/०९/२०२६ ते दि.१५/०९/२०२६ पर्यंत धार्मिक प्रथा-परंपरेनुसार संपन्न झाला. या उत्सवात दरारोज सकाळी ६.०० ते ६.४५ काकडा, ७.३० ते ९.०० गाथा भजन, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५.३० ते ६ हरिपाठ व रात्री ८ ते १० श्रीहरी कीर्तन संपन्न झाले. सप्ताहात श्री ह.भ.प. प्रशांत बुवा ताकोते, शिरसोली, श्री ह.भ.प. सुरेश बुवा बाकडे, पोफाळी, श्री ह.भ.प. भरत बुवा चौधरी, म्हैसवाडी, श्री ह.भ.प. अच्युत बुवा दस्तापूरकर, परभणी, श्री ह.भ.प. निवृत्ती बुवा तराळे, व्याळा आदी कीर्तनकारांचे कीर्तन संपन्न झाले. श्री गणेशयाग व वरूणयागास भाद्रपद शु. १ ला प्रारंभ होवून भाद्रपद शु. ४ ला सकाळी १० वाजता यागाची पुर्णाहूती झाली. तसेच श्रींचे समाधि सोहळ्या निमित्य श्रीहरी कीर्तन होवून कार्यक्रम संपन्न झाला.

यावर्षी श्री पुण्यतिथी उत्सवांत श्रींचे सेवेत ३९७ दिंड्यांनी सहभाग घेतला. यापैकी नियमांची पूर्तता केलेल्या एकूण ८० नविन दिंड्यांना १० टाळ, १ विणा, १ मृदंग, श्री ज्ञानेश्वरी, श्री तुकाराम गाथा, श्री एकनाथी भागवत असे संत वाङ्मय आणि श्री माऊली पताक वितरीत करण्यात आल्या. जुन्या दिंड्यांना भजनी साहित्य दुरूस्तीकरीता नियमाप्रमाणे सानुग्रह अंशदान व इतर व्यवस्थेकरीता सहयोग देण्यात आला. तसेच उत्सवानिमित्य आलेल्या भजनी दिंड्यांमधील वारकऱ्यांची भोजनप्रसादाची व्यवस्था तसेच प्रथमोपचार केंद्राची सुविधा विसावा संकूल येथे करण्यात आली.

तसेच उत्सव काळात श्री शेगांवसह श्री शाखा पंढरपूर, आळंदी, त्र्यंबकेश्वर, पंपासरोवर, ओंकारेश्वर, गिरडा अशा सर्व शाखांवर श्रींचा समाधि उत्सव संपन्न होऊन १,१०,००० चे वर भक्तांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. अशारितीने श्रीकृपेने वारकऱ्यांची व भाविकांची सेवा घडून आली आहे, श्रीं'चा ११६ वा पुण्यतिथी उत्सव साजरा करण्यात आला. या मध्ये १५ सप्टेबर रोजी सकाळी ७ ते ९ श्रींचे समाधि सोहळ्या निमित्त श्रींच्या पुण्यतिथी दिनी

.ह.भ.प. भरत बुवा चौधरी, मु. म्हैसवाडी यांचे श्रीहरी किर्तन झाले. श्रींच्या पुण्यतिथी दिनी सकाळी १० वाजता श्री गणेश याग व वरुण यागाची पुर्णाहूती व अवभृतस्नान ब्रह्मवृंदांच्या मंत्रोपचारात संपन्न झाली. त्यानंतर ठीक ११.१५ वाजता श्रींची आरती हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**श्रींची पालखी परिक्रमा मार्ग ...**

श्री पुण्यतिथी उत्सवानिमित्य श्रींची पालखी परिक्रमेला रथ इत्यादी भजनी दिंडीसह दुपारी ४.०० वाजता श्री मंदिर परिसरातून निघाली. श्री पालखी परिक्रमा मंदिर परिसरातील सेवाधारी प्रसादालय जवळील उत्तर द्वारातून, महात्मा फुले बँके समोरुन, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतीराव फुले चौकातून, श्री संत सावता माळी चौक, श्री हरिहर मंदिर जवळून, भिम नगर (तिन पुतळा परिसर), शाळा नं. २ (सावित्रीबाई फुले चौक), फुले नगरातून श्री प्रगटस्थळ जवळून. सितामाता मंदिर, लायब्ररी जवळून (श्री गर्गाचार्य मंदिरा समोरुन), पश्चिम गेटमधून श्री मंदिर परिसरामध्ये सायं. ६. वाजताचे परत येऊन आरती करण्यात आली आहे.

**श्री गजानन सेवा समिती**

श्री गजानन सेवा समिती शेगाव, नागपूर, अकोट यांच्यावतीनेही दोन दिवसभर महाप्रसाद वाटप करण्यात आला आहे. शहरात ठिकठिकाणी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. श्रींच्या पुण्यतिथी महोत्सवासाठी गर्दीचा अंदाज घेता शेगाव आगाराच्या वतीने जादा फेऱ्यांचा नियोजन करण्यात आले होते.

**आज पुण्यतिथी उत्सवाची सांगता.**

भाद्रपद शुद्ध ६ ला १६ सप्टेबर रोजी श्रींच्या ११६ वा पुण्यतिथी सोहळ्याची सांगता होणार आहे. सकाळी ६ ते ७ वाजता ह.भ.प. निवृत्ती बुवा तराळे, व्याळा यांचे काल्याचे किर्तन होईल व नंतर दहिहंडी व गोपालकाला होऊन या उत्सवाची सांगता होणार आहे. श्रींच्या ११६ व्या पुण्यतिथी उत्सवाच्या निमित्ताने मंदिर प्रशासनाने.उत्सवासाठी होणारी भाविकांची अलोट गर्दी लक्षात घेऊन, दि. १४ व १५ सप्टेंबर २०२६ असे दोन्ही दिवस श्रींचे मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले असल्याने भाविकांनी गर्दी न होता शांतते दोन दिवसांत एक लाख भाविकांनी श्रींच्या समाधी मंदिराचे दर्शन घेतले.

# जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर करण्याच्या मागणीसाठी 'स्वाभिमानी'चे अटाळीत टॉवरवर चढून आंदोलन

## जिल्हाध्यक्ष अमोल पाटील मोबाइल टॉवरवर चढले!

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**खामगाव** : जिल्ह्यात पावसाने प्रदीर्घ खंड दिल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली आहेत. जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अमोल पाटील यांनी मंगळवारी अटाळी येथे मोबाइल टॉवरवर चढून 'शोले स्टाईल' आंदोलन केले. जिल्ह्यात गेल्या सुमारे ४५ दिवसांपासून पावसाचा खंड पडल्याने सोयाबीन, मूग, उडीद यासह खरीप पिकांचे मोठे नुकसान झाल्याचा दावा अमोल पाटील यांनी केला. पिके हातातून गेल्यानंतर आता पाऊस झाला तरी नुकसान भरून निघणे शक्य नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. पिकांचे नुकसान आणि पावसाची स्थिती लक्षात घेऊन शासनाने तातडीने बुलढाणा जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी पाटील यांनी केली आहे.



**लोकप्रतिनिधींकडून बाजू मांडली जात नसल्याची टीका!**

बुलढाणा जिल्ह्यातील सातपैकी सहा आमदार सत्ताधारी पक्षाचे असून, त्यापैकी एक कॅबिनेट मंत्री आहेत, तसेच जिल्ह्यातील खासदार केंद्रीय राज्यमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळत आहेत. सत्तेत एवढे लोकप्रतिनिधी असतानाही जिल्ह्यातील शेतकऱ्यांची बाजू शासनदरबारी प्रभावीपणे मांडली जात नसल्याची टीका पाटील यांनी केली.

**....तर आमदार-खासदारांना फिरू दिले जाणार नाही!**

शासनाने शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत न पाहता बुलढाणा जिल्हा तातडीने दुष्काळग्रस्त जाहीर करावा. अन्यथा बुलढाणा लोकसभा मतदारसंघात आमदार-खासदारांना फिरू दिले जाणार नाही आणि यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा अमोल पाटील यांनी दिला. यावेळी परिसरातील शेतकरी आणि नागरिक मोठ्यासंख्येने आंदोलनस्थळी उपस्थित होते.

# खासगी बसची धडक; दुचाकीस्वार ठार !

## शेगाव-खामगाव मार्गावरील अन्नकुटीजवळ अपघात

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**खामगाव** : खामगाव-शेगाव मार्गावरील अन्नकुटीजवळ लासुरा शिवारात भरधाव खासगी बसने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. ही घटना १४ सप्टेंबर रोजी रात्री ८.४१ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भूषण वासुदेव गाळे (२६, रा. खार तळेगाव, ता. भातकुली, जि. अमरावती) हा खासगी बस (एमएच ०९ एफएल ५१२७) शेगावकडून खामगावकडे घेऊन जात होता. अन्नकुटीजवळ बसने खामगावकडून शेगावकडे येणाऱ्या दुचाकी (एमएच २८ एएम ७५५३) ला जोरदार धडक दिली. या अपघातात विजय लक्ष्मण सवडतकर (४४, रा. अमडापूर, जि. बुलढाणा) यांचा जागीच मृत्यू झाला. खासगी बसच्या डॅशबोर्ड कॅमेऱ्याच्या फुटेजच्या आधारे पोलिस कर्मचारी मंगलसिंग सोळंके यांच्या फिर्यादीवरून शेगाव ग्रामीण पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील कलम १०६(१), २८१, ३२४ (४) तसेच मोटार वाहन कायद्यातील कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस उपनिरीक्षक विनीत घाटोळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी आरोपीला १५ सप्टेंबर रोजी पहाटे २.३३ वाजता अटक केली. न्यायालयाने त्याला २८ सप्टेंबरपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. पुढील तपास शेगाव ग्रामीण पोलिस करीत आहेत.

# रेल्वेमार्गावर आढळला अज्ञाताचा मृतदेह !

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**नांदुरा** : बिस्वा ब्रिज-खुमगाव बुर्टी रेल्वेमार्गादरम्यान पोल क्रमांक ५१२/२१-२३ च्या मध्यभागी अज्ञात पुरुषाचा मृतदेह आढळल्याची घटना मंगळवारी (दि. १५ सप्टेंबर) सकाळी उघडकीस आली.

ट्रॅकमॅन उत्तम बाबुराव अढाव (४०, रा. युनिट क्रमांक २, बिस्वा ब्रिज एसएसई, शेगाव) यांनी याबाबत पोलिसांना माहिती दिली. बिस्वा ब्रिज रेल्वे स्थानकाचे स्टेशन प्रबंधक कमलेश मारुती चाचेरे यांच्या स्वाक्षरीचा मेमो पोलिसांना सादर करण्यात आला. त्यानुसार, स्वप्नील निवृत्ती भालतडक यांनी फोनद्वारे केएम ५१२/२१-२३ दरम्यान एक व्यक्ती रेल्वेमार्गावर पडलेल्या अवस्थेत असल्याची माहिती दिली होती. सकाळी ७.२५ वाजता ती व्यक्ती मृतावस्थेत आढळली. मेमोच्या आधारे पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, रेल्वेतून पडल्याने मृत्यू झाल्याची शक्यता आहे. मृताची ओळख पटलेली नसून, नांदुरा पोलिस तपास करीत आहेत.

# झोडगा अतिवृष्टीग्रस्तांना तात्काळ मदत आणि मूलभूत सुविधा मिळण्यासाठी रिपब्लिकन सेनेचे निवेदन

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**मलकापुर** : झोडगा येथील अतिवृष्टीग्रस्तांना मदत मिळण्यासाठी आणि झोडगा या गावात मूलभूत सुविधा मिळन्यासाठी जिल्हाध्यक्ष विजय मोरे इंजिनीयर यांच्या मार्गदर्शनात आणि जिल्हा संघटक अजय प्रभाकर सावळे यांच्या नेतृत्वात आज दि.१५ सप्टेंबर २६ तहसीलदार समाधान सोनवणे यांना निवेदन देण्यात आले .

याबाबत सविस्तर वृत्त असे की,गत महिन्यात ३१ ऑगस्ट २०२६ ला झालेल्या अतिवृष्टीत झोडगा या गावातील शेतकऱ्यांचे आणि गावातील घरांची खूप नुकसान झाले होते. या संदर्भात शासनाने स्पॉट पंचनामे सुद्धा केले होते. यासंदर्भात दोन महिने होऊनही अजूनही शासनाची मदत प्राप्त झाली नाही. नुकसान भरपाई



आणि गावातील मूलभूत सुविधांसाठी रिपब्लिकन सेनेच्या नेतृत्वात निवेदन देण्यात आले.

निवेदन देतेवेळी रिपब्लिकन सेनेचे भीमराव नितोने,संजय वानखडे, प्रताप बिराडे, सुखदेव गव्हाळे, गौतम वाकोडे, भोना मोरे,सुनील वानखेडे, सतीश सावळे,अमोल झनके ,संजय झनके, चंद्रभान झनके, गोविंदा झनके, अमर सुरवाडे, शिवा पाटील, पवन कुमार गायकवाड, दिलीप प्रभाकर झनके, प्रदीप गायकवाड ,विनोद चव्हाण, करण चव्हाण, राजू सिंग दामोदर, सतीश हिवाळे, भागाजी कडूबा हिवाळे ,संदीप डाबेराव , दुर्गा सिंग चव्हाण ,रमेश मोरे,गुलाब सिंग डाबेराव ,नरसिंग डाबेराव, प्रल्हाद वाघ ,भगवान इंगळे ,सुरेश महाले ,गजानन फिरके, विठ्ठल कवठले,विठ्ठल पोडये,सुखदेव आव्हाड ,श्रीकृष्ण पोड्ये,सुनील डाबेराव, सुपळा सिंग डाबेराव, गजानन नारखेडे, अजय चव्हाण ,संदीप वाघमारे ,विनोद मोरे ,राजू शेले ,जगदेव वाघमारे उपस्थित होते.

# सांडपाण्याचा प्रश्न ऐरणीवर !

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**खामगाव** : सुटाळा खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील सावजी लेआउट व उदासी लेआउट परिसरात सांडपाण्याच्या निचऱ्याची पुरेशी व्यवस्था नसल्याने नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. सांडपाण्याचा कायमस्वरूपी निचरा करण्यासाठी नाली अथवा भूमिगत गटाराची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामपंचायतीकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. पॉइंट ते महाराणी येसूबाई भोसले चौक, खत्री यांच्या किराणा दुकानापर्यंत तसेच लायन्स कॉन्व्हेंटच्या मागील नाल्यापर्यंतच्या रस्त्यालगत सांडपाणी साचत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनावर श्रीराम झाडोकार, गणेश मोहे, प्रमोद इंगळे, प्रमोद खरसने, सागर हिवसे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

विविध घरांमधून व इमारतींमधून बाहेर पडणाऱ्या सांडपाण्याचा योग्य निचरा होत नसल्याने रस्त्यावर पाणी साचते. त्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण होत आहे. यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# भरधाव मालवाहूची कारला धडक; चालकावर गुन्हा दाखल

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**खामगाव** : नांदुरा-शेगाव मार्गावरील पहुरजिरा (ता. शेगाव) येथे भरधाव मालवाहू वाहनाने कारला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात कारच्या मागील भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. ही घटना १४ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी साडेतीन वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलिसांनी मालवाहू चालकावर गुन्हा दाखल केला. मिळालेल्या माहितीनुसार, योगेश सारंग पहुरकर (रा. पहुरजिरा) हा मालवाहू वाहन (क्र. एमएच २८ एटी ६१८०) घेऊन जात होता. पहुरजिरा येथे दिनेश ओमप्रकाश राठी (३५, रा. मोतीपुरा, नांदुरा) यांच्या कारला (क्र. एमएच २८ एएन १९९९) पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत कारच्या मागील भागाचे मोठे नुकसान झाले. याप्रकरणी दिनेश ओमप्रकाश राठी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मालवाहू वाहनचालक योगेश सारंग पहुरकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

# स्मार्ट मिटर लावण्याचा आग्रह करत असाल तर स्मार्ट रोहित्रही द्या, शेतकऱ्यांना दिवसा 8 तास अखंड विज पुरवा - माजी आमदार दिलीपकुमार सानंदा

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**खामगाव** : खामगाव विधानसभा मतदार संघामध्ये गेल्या ४० ते ४५ दिवसांपासुन पाऊस नव्हता अश्या वेळेस शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह हा हंगामी पिकांवर अवलंबुन आहे.त्या माध्यमातून पाण्याची सुविधा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या तक्रारी आल्या.पावसाळयाचे दिवस असतांना सुध्दा फक्त एक-दोन दिवस तोही कमी प्रमाणात पाऊस पडला. रोहित्र जळाल्यानंतर नियम असा आहे की, २४ तासाच्या आत ते रोहित्र दिले पाहिजे. वेळेवर रोहित्र मिळाले नाही, व वरुण राजाही बरसला नाही अश्या परिस्थितीमध्ये काही ठिकाणी विहिरींना पाणी असुन सुध्दा रोहित्र जळाल्यामुळे त्यांना पाणी देता येत नव्हतं,महावितरणचे अधिकारी-कर्मचारी हे फोन उचलत नव्हते.फोन उचलले तर उडवा-उडवीचे उत्तरे देत होते. महावितरणच्या कारभाराबदद्‌ल शेतकरी बांधवांमध्ये तीव्र संताप होता. म्हणून दि.१५ सप्टेंबर २०२६ रोजी खामगाव येथील कार्यकारी अभियंता यांच्या दालनात कास्तकार बांधवांना घेवुन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अभियंत्यांना जाब विचारला.

ज्या ठिकाणचे रोहित्र जळाले त्या ठिकाणी शक्यतो २४ तासाच्या आत रोहित्र दिले जातील, सर्वात महत्वाचे म्हणजे ज्या प्रमाणे स्मार्ट मिटर लावण्याचा त्यांचा आग्रह असतो, त्या विषयी मोठया प्रमाणात



तक्रारी आहेत.खामगाव मतदार संघातील रोहित्रांची अत्यंत दयनीय परिस्थिती आहे त्या जळुन केव्हाही अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. स्मार्ट मिटरचा तुमचा आग्रह आहे तेव्हा त्याच प्रमाणे स्मार्ट रोहित्र खामगाव विधानसभा मतदार संघात बसवावे व दिवसामध्ये ८ तास सलग विज शेतकरी बांधवांना द्यावी.अन्यथा बळीराजासाठी तीव्र आंदोलन करणार असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता सखाराम थानवी यांना दिला.

यावेळेस त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख, खामगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, शहर उपाध्यक्ष नरहरी टिकार गुरुजी, खामगाव राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, अल्पसंख्यांक तालुका अध्यक्ष बिलाल खाँ पठान, कृ.उ.बा.स.संचालक विलाससिंग इंगळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बबलु राठोड, सर्कल प्रमुख जयराम मुंडाले, एजाज देशमुख, श्याम गायगोळ, गणेश पाटील, रोहित राजपुत,गजानन जाधव,समीर शेख,माजी सरपंच विलास इंगळे आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, रोहित्रावर लावलेले बॉक्समधील कटआऊट, केबल उघडया स्थितीत असुन ते जिर्ण व धोकादायक स्थितीत आहे. त्यामुळे त्या रोहित्रांची तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी. महावितरण अंतर्गत जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून जी कामे सुरु आहे,राजकीय पाठबळ असलेले अनेक कंत्राटदार आहे ते अरेरावी करुन त्या माध्यमातून निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांची व त्याला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांची खैर नाही, आपण चांगल्या प्रकारची कामे करा असा इशारा देखील याप्रसंगी सानंदांनी दिला.

आता गणेशोत्सव आहे गणेशोत्सवामध्ये विद्युत खंडीत होता काम नये.शेतकऱ्यांना दिवसा ८ तास लाईन देता यावी यासह अनेक विषयांवर चर्चा झाली.ज्यांना सिंगल फेजवरुन मिटर आहे परंतू त्यांना नियमानुसार विज पुरवठा होत नाही अश्यांना दिवस-रात्र विज पुरवठा देण्यात यावा.शेती पंपासाठी थ्री फेज विजपुरवठा सुरळीत ठेवावी.अनेक कुटुंब शेतात राहतात परंतु रात्रीच्या वेळेस वीज पुरवठा खंडित राहत असल्यामुळे साप,विंचू तसेच अन्य प्राण्यांपासून शेतकरी बांधव व त्यांच्या कुटुंबियांना धोका संभवतो व त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.नैसर्गिक परिस्थितीमुळे अडचणीचा सामना करावा लागत असल्यामुळे आपण चांगल्या प्रकारची कामे करावी,बळीराजा हा देशाचा पोशिंदा आहे,बळीराजावर जर अन्याय झाला तर मी सत्तेमध्ये असलो तरी आपला कारभार सुधारला नाही व भ्रष्टाचार करणाऱ्या कंत्राटदारांनां पाठीशी घातले तर लोकप्रिय पालकमंत्री मकरंद आबा पाटील व संबंधीत मंत्री महोदयांकडे याबाबत तक्रार करणार तसेच या ठिकाणी मोठया प्रमाणावर शेतकरी बांधवांना घेवुन आंदोलन करेल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महावितरण व संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर राहील असेही यावेळी सानंदांनी सांगितले.

यावेळी तानाजी चव्हाण,राजेंद्र जाधव,सुधाकर जाधव,गणेश इंगळे, प्रदिप इंगळे, पुरुषोत्तम भोसले, शेषराव भोसले, शेख साबीर शेख लाल,बाळु वाघमारे, अर्जुन गुजर,अरविंद अंभोरे,मयुर सातव,कुणाल राजपुत,प्रणव बिल्लारे, तुकाराम वाघमारे,सतीष सोळंके,योगेश बिल्लारे,संकेत गवई,संदिप दाभाडे,रामेश्वर अंभोरे, अभिषेक हिवरखेडे, अक्षय बदरखे यासह असंख्य शेतकरी बांधवांची उपस्थिती होती.

सिटी न्यूज सुपरफास्ट
वऱ्हाड

बुधवार, दि.१६ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

# काटेपूर्णा धरणात केवळ 22 टक्के साठा अकोल्यावर पाणीसंकट!

## वॉल्व्ह गळतीमुळे अनेक भागांत दहा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**अकोला:** काटेपूर्णा धरणात अवघा २२ टक्के पाणीसाठा उरल्याने शहरावर पाणीसंकट ओढावले आहे. त्यातच वॉल्व्ह गळतीमुळे अनेक भागांत दहा दिवसांपासून पाणी बंद असल्याने नागरिक त्रस्त आहेत.

अकोला शहराला जलापूर्ति करणाऱ्या काटेपूर्णा धरणात अवघा २२.६४ टक्के जलसाठा शिल्लक राहिल्याने अकोलेकरांवर गंभीर पाणीटंचाईचे सावट पसरले आहे. महापालिकेकडून पाणी नियोजनाच्या नावाखाली तब्बल आठ दिवसांआड पाणीपुरवठा केला जात आहे. त्यातच अकोट फाईल, नयागाव, दुबेवाडी आणि शंकर नगर परिसरात गेल्या १० दिवसांपासून पाण्याचा एक थेंबही आलेला नाही. मुख्य पाईपलाईनचा वाल्व्ह लीक झाल्याने दुरुस्तीचे काम सुरू आहे, मात्र हे काम अत्यंत कासवगतीने सुरू असल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला आहे. यामुळे नागरिकांना पाण्यासाठी दरदर भटकावे लागत आहे. दुसरीकडे, ज्या भागात पाणी येत आहे, तिथे अत्यंत मटमैले आणि दुर्गंधीयुक्त पाणी येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. संबंधित कंत्राटदाराने वाल्व्ह दुरुस्तीचे काम तात्काळ पूर्ण करून सुरळीत पाणीपुरवठा करावा आणि स्थानिक या समस्येकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी जोरदार मागणी नागरिक करत आहेत.

## शिक्षणाकारी पवारांच्या केबिनला बाहेरुन कडी लावून आत बैठक



प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अकोला:** जिल्हा परिषदेचे प्राथमिक शिक्षणाधिकारी पवारांच्या केबिनबाहेर कडी लावून आत बैठक सुरू असल्याने भेटायला आलेले शिक्षक आणि नागरिक ताटकळत राहिले. या प्रकारामुळे तीव्र संताप व्यक्त होत होता. सामान्य लोकांच्या कामासाठी अधिकारी असून बंद दाराआड प्रशासन कसे लोकहिताचे कामे करणार असा प्रश्नच आहे. शिक्षणाधिकारी पवार यांच्या कार्यालयात महत्त्वाची बैठक सुरू असताना, केबिनला चक्क बाहेरून कडी लावण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. यामुळे आपल्या विविध समस्या आणि कामांसाठी आलेल्या शिक्षक आणि नागरिकांना तासनतास बाहेर ताटकळत राहावे लागले. अधिकारी आत बैठकीत व्यस्त असताना केबिनला बाहेरून कडी लावण्याची नेमकी गरज का भासली? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. सामान्य नागरिक आणि शिक्षकांसाठी भेटीची कोणतीही निश्चित वेळ किंवा व्यवस्था नाही का, आणि नागरिकांना नक्की किती वेळ ताटकळत ठेवले जाणार, असा प्रश्न विचारला जात आहे.

## सिटी बस सुरु झाली तर... ऑटो चालकांच्या मनात धाकधूक

प्रतिनिधी १६ सप्टेंबर





**अकोला:** ऑक्टोंबर महिन्याच्या मध्यात महापालिकेची सिटी बस सेवा सुरू होऊ शकते. पण, यामुळे आता पासूनच ऑटो चालकांच्या मनात धाकधूक दिसते. सिटी बस सोबत स्पर्धा करताना ऑटो चालक प्रवासी हिताचा निर्णय घेणार का असे अनंत प्रश्न निर्माण झाले आहेत. ऑक्टोबर महिन्यात अकोल्यात महापालिकेची सिटी बस सुरु होणार आहे. या सिटी बसने सर्वाधिक रोजगार देणारा ऑटो चालकांचा व्यवसाय हा धोक्यात येणार आहे. पुढील एक महिन्यात सिटी बस रस्त्यावर आल्यावर काय होणार हे आता जरी सांगू शकत नसलो तरी ऑटो चालकांच्या प्रतिक्रिया मात्र बोलक्या आहे. शहरातील ऑटो चालकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. उद्या सिटी बस सुरू झाली तर आमच्या अस्तित्वावर निश्चित घाला येईल. पेट्रोलचे दर वाढले असल्याने दर कमी करणे परवडणारे नाही. तरीही काही ऑटो चालकांनी या बाबतीत सहमती दर्शवली. तसेच सिटी बस पूर्वी देखील सुरू होती. त्यामुळे ही सेवा किती दिवस सुरू राहील याविषयी काहींनी शंका उपस्थित केली. शहरात अवैध ऑटोरिक्षा चालत आहे. किती जणांकडे परमिट आहे याकडे लक्ष दिले जात नाही. परंतु नवीन संकट आमच्या समोर उभे केले आहे. शासन आमचा विचार करेल का असा प्रश्न देखील काही ऑटो चालकांनी उपस्थित केला. आरआरसी नेटवर्कच्या नेहा पाटील यांच्याशी बोलताना त्यांनी रोखठोक मते मांडली.

## एनसीएमसी कार्ड सक्तीला 30 सप्टेंबरपर्यंत स्थगिती

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अकोला :** ज्येष्ठ नागरिक तसेच महिला प्रवाशांना १ सप्टेंबरपासून अनिवार्य करण्यात आलेल्या 'एनसीएमसी' कार्डाबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. एनसीएमसी कार्ड कार्यप्रणालीच्या सर्व्हरवर वाढलेल्या प्रवासी संख्येमुळे येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत एनसीएमसी कार्ड अनिवार्यतेतून मुदतवाढ देण्यात आली आहे.

यासंदर्भात महामंडळाच्या वाहतूक विभागाने राज्यातील विभाग नियंत्रक, आगार व्यवस्थापक तसेच संबंधित अधिकाऱ्यांना सूचना जारी केल्या आहेत. १ सप्टेंबरपासून ज्येष्ठ नागरिक सवलतीसाठी एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, कार्ड प्रणालीवरील वाढलेल्या भारामुळे प्रवासादरम्यान सवलतीचे तिकीट देताना अडचणी निर्माण होत असल्याचे महामंडळाच्या निदर्शनास आले. त्यामुळे सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मंजुरीनंतर ३० सप्टेंबरपर्यंत ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना पूर्वीप्रमाणे प्रचलित कार्यपद्धतीनुसार एसटी प्रवास सवलतीचे तिकीट देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, एनसीएमसी कार्डच्या तांत्रिक अडचणींमुळे ज्येष्ठ नागरिक व महिला प्रवाशांना पूर्ण तिकीट आकारले जाण्याच्या तक्रारी येत असताना महामंडळाने घेतलेल्या या निर्णयामुळे संबंधित प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. संबंधित आगार व्यवस्थापकांनी आपल्या अखत्यारितील सर्व आगारांमधील वाहक, चालक तसेच वाहतूक कर्मचाऱ्यांना याबाबत सूचना द्याव्यात, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## अकोल्याचे श्याम चेंडके यांचा पुण्यात मानाच्या गणपती मंडळांकडून सत्कार

प्रतिनिधी १६ सप्टेंबर



**अकोला:** मुंबईचा लालबागचा राजा आणि पुण्यातील मानाच्या पाच गणपतींना अकोल्यातील श्याम चेंडके विशेष जानवे अर्पण करतात . त्यांच्या या भक्तिमय सेवेचा पुण्यात झाला भव्य सत्कार झाला. अकोल्यातील प्रसिद्ध जानवे निर्माते श्याम चेंडके आणि त्यांचे कुटुंब गेल्या अनेक वर्षांपासून मुंबईचा लालबागचा राजा, चिंचपोकळीचा राजा, गणेश गल्ली, तसेच पुण्यातील कसबा, तांबडी जोगेश्वरी, गुरुजी तालीम, तुळशीबाग आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीसारख्या नामवंत बाप्पांसाठी उंच जानवे तयार करून अर्पण करतात. त्यांच्या या अखंड सेवेची दखल घेत यंदा पुण्यातील मानाच्या गणपती मंडळांनी श्याम चेंडके व त्यांचे सुपुत्र अजिंक्य चेंडके यांना विशेष निमंत्रित केले.

## भक्ती आणि आरोग्याचा अनोखा मेळ

### स्वराज्य गणेशोत्सव मंडळातर्फे मोफत रक्त तपासणी शिबीर

प्रतिनिधी १६ सप्टेंबर






**अकोला:** गणेशोत्सवाचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत असून, धार्मिक सोहळ्यांसोबतच सामाजिक भान जपण्याची परंपरा अकोल्यातील 'स्वराज्य गणेशोत्सव मंडळाने' यंदाही कायम ठेवली आहे. मंडळाचे प्रमुख नगरसेवक गिरीश गोखले यांच्या नेतृत्वाखाली यंदाच्या गणेशोत्सवाचे औचित्य साधून जठारपेठ चौकात नागरिकांसाठी एका भव्य निःशुल्क विविध रक्त तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास स्थानिक नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. त्याच बरोबर आयोजक स्वराज्य गणेशोत्सव मंडळ सदस्यांचे कौतुक ही केले.

'उत्सव फक्त आनंदाचाच नाही, तर समाजाच्या आरोग्याचा आणि कल्याणाचा मार्ग दाखवणारा असावा,' या भावनेतून गिरीश गोखले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या उपक्रमाची आखणी केली आहे. आजच्या धावपळीच्या युगात नागरिक स्वतःच्या आरोग्याकडे आणि नियमित तपासण्यांकडे दुर्लक्ष करतात. हीच बाब लक्षात घेऊन सर्वसामान्य जनतेला महागड्या आरोग्य चाचण्या मोफत उपलब्ध करून देण्याचा मानस मंडळाने व्यक्त केला आहे. शिबीर मंगळवार, १६ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता सुरु झाले. या शिबीरामध्ये नागरिकांसाठी पूर्णपणे मोफत मिळणाऱ्या मुख्य चाचण्यांमध्ये सीबीसी, किडणी तपासणी साठीची केएफटी, लिव्हर तपासणीसाठी आवश्यक एलएफटी, रक्तातील शर्करा तपासणीची आरबीएस, थायरॉईड ग्रंथीची तपासणी करण्यासाठी आवश्यक टीएफटी आणि रक्तातील कोलेस्ट्रॉल व चरबीचे प्रमाण तपासण्यासाठी लिपिड प्रोफाईल या अत्यंत महत्त्वाच्या चाचण्यांचा समावेश होता. रक्त तपासणीचे रिपोर्ट अचूक यावेत यासाठी नागरिकांनी तपासणीपूर्वी किमान ८ ते १० तास उपाशी पोटी (रिकाम्या पोटी) उपस्थित राहावे.

## उकाड्याने नागरिक हैराण

प्रतिनिधी १६ सप्टेंबर

**अकोला:** अकोला शहरासह जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे नागरिकांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे. गेल्या काही दिवसांपासून पावसाचा पत्ता नसल्याने वातावरणातील आर्द्रता वाढली आहे. त्यामुळे शहराचे तापमान ३० ते ३४ अंश सेल्सिअसच्या दरम्यान पोहोचले असून, पावसाळ्याच्या दिवसांतही नागरिकांना ऑक्टोबर हिटसारख्या तीव्र उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्याच्या मोसमात उन्हाळ्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

## आधी वंदू तुज मोरया...







श्री गणेशोत्सव मंडळ देवरावबाबा,अकोला



श्री सिद्धिविनायक मित्र मंडळ,देवराव बाबा चाळ



युवराज राजु बोरकुटे ,मारोती नगर, बाळापूर नाका अकोला



अवय्यानं यादव ( कैलास टेकडी)]अकोला



पवन गावंडे, मोठी उमरी,अकोला



शुभम खडसने ( गुडधी), अकोला



प्रणव महामुने, खामगांव

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135